❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती मंगळवार, दि. ०४ ऑगस्ट २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २२० ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक




# नीरा नदीकाठी भक्ती, परंपरा आणि निसर्गाचा अद्भुत संगम

■ नीरा (दै. संध्या)

"भरुनी पावलो... माऊलीशी भेटलो... आता धन्य झालो करूनिया वारी..." या अभंगाच्या ओळी सोमवारी नीरा नदीच्या तीरावर अक्षरशः साकार झाल्या. परतीच्या वारीत पुणे जिल्ह्यात दाखल झालेल्या संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याचे नीरा येथे पारंपरिक निरास्नान मोठ्या भक्तिभावात पार पडले. 'माऊली... माऊली...' आणि 'ज्ञानबा-तुकाराम'च्या अखंड जयघोषात दत्त घाट परिसर भक्तिमय झाला होता.

सकाळी साडेआठच्या सुमारास पालखी सोहळा नीरा येथे दाखल झाला. दत्त घाटावर विधिवत पूजनानंतर माऊलींच्या पादुकांना नीरा नदीच्या

## पादुकांच्या स्पर्शदर्शनाने विणेकर भावविभोर

पवित्र जलाने निरास्नान घालण्यात आले. हजारो वारकरी, ग्रामस्थ आणि भाविक या सोहळ्याचे साक्षीदार झाले. नदीकाठावर दुमदुमणाऱ्या नामघोषामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. निरास्नानानंतर पार पडणाऱ्या पादुकांच्या स्पर्शदर्शनाच्या परंपरेने भाविक अक्षरशः भारावून गेले. ब्रिटिशकालीन पुलावर पालखीचा रथ उभा असताना दिंड्यांतील विणेकरी क्रमाने उभे राहतात आणि माऊलींच्या पादुका प्रत्येक विणेकरापर्यंत नेल्या जातात. वारकरी संप्रदायात हा क्षण म्हणजे माऊली स्वतः भेटीला आल्याची अनुभूती मानली जाते. पादुकांचा स्पर्श होताच अनेक वारकऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.ही शतकानुशतके जपली गेलेली परंपरा आजही अखंड सुरू आहे

यंदा वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात संपत धार पाऊस सुरू असल्याने धरणातून मोठ्या प्रमाणात निरा पात्रात पाणी सोडण्यात येत असल्याने नीरा नदी दुथडी भरून वाहत होती. पाण्याखाली गेलेला दत्त घाट, वेगवान प्रवाह, ब्रिटिशकालीन पुलावरून मार्गस्थ होणारा पालखी सोहळा आणि नामस्मरणात तल्लीन झालेले वारकरी यामुळे भक्ती आणि निसर्गाचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. निरास्नानाचा सोहळा पार पडल्यानंतर पालखी सोहळा नीरा येथील विठ्ठल मंदिरात विसावला. दुपारी दोन वाजता सोहळा महर्षी वाल्मिकींची नगरी वाल्हे येथील मुक्कामासाठी मार्गस्थ झाला माऊलींचा आजचा मुक्काम वाढले येथे तर उद्याचा मुक्काम सासवड येथे असणार आहे त्यानंतर हा पालखी सोहळा पुण्यामध्ये दाखल होईल.

परतीची वारी असली तरी वारकऱ्यांच्या उत्साहात कुठेही कमी जाणवत नव्हती. प्रत्येकाच्या ओठांवर एकच भावना होती— " भेटलिया माऊली ... वारी धन्य झाली!"



## संध्या प्रहार




## थोडक्यात...

### मराठी रंगभूमीवर शोककळा

मुंबई : दैनिक संध्या

मराठी सिनेसृष्टीतून एक दुःखद बातमी समोर येत आहे. हरहुन्नरी आणि अतुलनीय अभिनेता ऋषिकेश कानडे यांचं निधन झालं आहे. 3 ऑगस्ट 2026 म्हणजेच सोमवारी पहाटेच्या सुमारास त्यांचं निधन झालं आहे. त्यांचं अल्पशा आजाराने निधन झालं असल्याची माहिती आहे. वयाच्या 38 व्या वर्षी



त्यांनी अखेरचा श्वास घेतला असल्याची माहिती आहे. ऋषिकेश कानडे हे एक प्रगल्भ अभिनेता होते. तसेच ते देशप्रेमी होते. त्यांच्या निधनानंतर कानडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. 'मी भारतीय' ही एक देशभक्ती आणि राष्ट्रीय भावनांवर आधारित नाटक आहे. याचे जवळपास 300 प्रयोग करताना त्यांच्या देशप्रेमाचं प्रत्यंतर यायचं. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावर व्याख्यान देताना ते महाराजमय होऊन जायचे. प्रत्येक भूमिका साकारत असताना, त्या भूमिका जगत होते. जीव ओतून ऋषिकेश कानडे भूमिका साकरत होते. त्यांच्या प्रत्येक भूमिकांना प्रेक्षकांकडून प्रेम आणि दाद मिळायची. प्रेक्षकांच्या हृदयात त्यांनी घर तयार केलं होतं.

# श्रीकांत शिंदेंविरुद्ध लढलेल्या ठाकरेंच्या वैशाली दरेकरांनी पद सोडलं

■ मुंबई (दै. संध्या)

ठाकरेंच्या शिवसेना (Shivsena) पक्षातील गळती काही केल्या कमी होताना दिसून येत नाही. गेल्याच महिन्यात ऑपरेशन टायगरच्या अंतर्गत ठाकरेंच्या सहा खासदारांनी आपला स्वतंत्र गट स्थापन करत उद्धव ठाकरेंना जय महाराष्ट्र केला. त्यानंतर, या सहाही खासदारांनी एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिवसेना पक्षात प्रवेश केला. तर, इतरही ठिकाणी जिल्हास्तरावर पक्षात काही बदल होत असल्याचं सातत्याने दिसून येतं. आता, ठाकरेंच्या शिवसेनेकडून लोकसभा (Kalyan) निवडणूक लढवलेल्या वैशाली दरेकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे, वैशाली दरेकर आता कोणत्या पक्षात प्रवेश करणार याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कल्याण लोकसभा जिल्हा महिला संघटक वैशाली दरेकर राणे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. वैशाली दरेकर यांनी कल्याण लोकसभा मतदारसंघात उबाठामधून उमेदवारी घेत खासदार श्रीकांत शिंदे यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती. मात्र, आता वैयक्तिक कारणास्तव आपण पक्षाच्या कामाला वेळ देऊ शकत नसल्याने पदाचा राजीनामा दिल्याचे त्यांनी म्हटले आहे.

"साहेब, मी वैशाली दरेकर राणे, महिला जिल्हासंघटक या पदावर दोन वर्षापासून कार्यरत आहे. परंतु, सध्या माझ्या वैयक्तिक कर्तव्यांमुळे मी सदर पदाला न्याय आणि वेळ देऊ शकत नाही. म्हणून, माझ्या महिला जिल्हा संघटक या पदाचा मी



स्वेच्छेने राजीनामा देत आहे, त्याचा स्विकार करावा ही विनंती," असा मजकूर वैशाली दरेकर यांनी आपल्या राजीनामा पत्रात लिहिला आहे.

ठाणे जिल्ह्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी आणि नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीसंदर्भात 'मातोश्री'वर बोलावण्यात आलेल्या बैठकीत जोरदार राडा झाला. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीतच ठाण्यातील दोन गटांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये तीव्र शाब्दिक बाचाबाची झाली. हा प्रकार पाहून उद्धव ठाकरे अत्यंत संतापले आणि त्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी केली. ठाण्यातील कळवा आणि कल्याण मतदारसंघातील पक्षसंघटनेचा आढावा घेण्यासाठी या महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी कल्याणमधील काही पदाधिकाऱ्यांच्या हकालपट्टीवरून हा वाद झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# भाजपच्या प्रतिष्ठेला 'दे धक्का'

## बिहार पोटनिवडणुकीत प्रशांत किशोरांचा मोठा विजय, ३० वर्षांपासूनच्या बालेकिल्ल्याला सुरुंग



### भाजपा राष्ट्रीय अध्यक्षांची प्रतिष्ठा पणाला

भाजपचे नवनियुक्त राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या वैयक्तिक प्रतिष्ठेची ही निवडणूक होती. नोव्हेंबर 2025 च्या विधानसभा निवडणुकीत नितीन नवीन विक्रमी मतांनी जिंकले, पण राज्यसभा सदस्य झाल्यानंतर त्यांनी आमदारकीचा राजीनामा दिला, आणि नंतर जानेवारी 2026 मध्ये त्यांची भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली. नितीन नवीन भारतीय जनता पक्षाच्या इतिहासातील सर्वात तरुण, वयाच्या 45 व्या वर्षी आणि बिहारमधून राष्ट्रीय अध्यक्ष हे पद मिळवणारे पहिले नेते ठरले. त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या घरच्या मतदारसंघातील निकाल हा त्यांच्या वैयक्तिक व राजकीय प्रतिष्ठेशी थेट जोडला गेला आहे.

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन राज्यसभेवर आल्यानंतर त्यांच्या होम पीचवर म्हणजेच त्यांच्या स्वतःच्या विधानसभा मतदारसंघात प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पक्षाने जोरदार लढत दिली. राजकीय रणनीतीच्या कॉर्पोरेट उद्योगातून राजकारणात उडी घेतलेल्या प्रशांत किशोरांचा या निवडणूक निकालामुळे जोरदार लॉँचिंग झालं आहे. या निवडणुकीच्या वेगवेगळ्या अर्थांचा मागोवा निकालानंतर घेतला जात असून काँग्रेसशिवाय भाजपला विरोध करणारा नवा चेहरा प्रशांत किशोर यांच्यारुपाने उदयास आला आहे. येथील पोटनिवडणुकीत प्रशांत किशोर यांचा विजय म्हणजे भाजपच्या प्रतिष्ठेला धक्का मानला जात आहे. दरम्यान, प्रशांत किशोर यांनी 18,953 मतांनी दणदणीत विजय मिळवला. बिहारमधील बांकीपूर विधानसभा भारतीय जनता पक्षाचा बालेकिल्ला आहे. नितीन नवीन यांनी सलग पाच वेळा विधानसभा जिंकली आहे. 2010 च्या परिसीमनानंतर तयार झालेल्या बांकीपूर 2010, 2015, 2020 आणि 2025 विधानसभा निवडणुकांत नितीन नवीन विजयी झाले होते. त्याआधी याच भागातून पटना पश्चिम या मतदारसंघात नितीन नवीन यांचे वडील नबीन किशोर सिन्हा हेही 1995 पासून सलग चार वेळा निवडून आले होते. त्यामुळे, बिहारमध्ये ही जागा भाजपचा दीर्घकाळचा शहरी बालेकिल्ला मानली जाते. त्यामुळे, 30 वर्षांपासूनच्या भाजपच्या बालेकिल्ल्याला सुरूंग लागल्याचं बोललं जात आहे. राज्यसभेवर गेल्यानंतर नितीन नवीन यांनी जागा सोडल्यामुळे झालेल्या पोटनिवडणुकीत 30 जुलै रोजी मतदान झाले असून 3 ऑगस्ट रोजी मतमोजणी पार पडली. या निवडणुकीत भाजपला मोठा फटका बसला. पक्षाचे पहिले उमेदवार अभिषेक कुमार बंटी यांनी कौटुंबीक कारणांचा हवाला देत अर्ज मागे घेतला, त्यानंतर भाजपने बिहारच्या दतिया मतदारसंघातून आशुतोष तिवारी आणि बांकीपुरातून नीरज कुमार सिन्हा यांना उमेदवार केले. या पोटनिवडणुकीत जनसुराजचे प्रशांत किशोर, राजदच्या रेखा गुप्ता आणि एनडीए-समर्थित भाजप उमेदवार नीरज कुमार सिन्हा यांच्यात मुख्य लढाई झाली

भाजप राष्ट्रीय अध्यक्षांचा स्वतःचा मतदारसंघ, शहरी बालेकिल्ला असूनही उमेदवार बदलावा लागणे, आणि प्रशांत किशोरांसारख्या नव्या राजकीय खेळाडूचा पहिलेच निवडणुकीतील विजय या सर्व कारणांमुळे 3 ऑगस्टचा निकाल भाजपसाठी फटका मानला जातो आहे पण त्यातून प्रशांत किशोर नावाचा नवा नेता भाजपविरोधातील अवकाशात राष्ट्रीय राजकारणच्या पटलावर उदयास आला आहे, हे लक्षात घ्यावे लागेल.

# सचिन अहिर पुणे दौऱ्यावर : संघटन मजबूत करण्यासाठी करणार काम

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी सोमवारी पुणे शहराला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी पक्ष संघटन, पुण्यातील सद्यस्थिती आणि विविध समकालीन विषयांवर भाष्य केले. उपसभापतीपदाची जबाबदारी सांभाळत असलो तरी मी पक्षाचा एक कार्यकर्ता असून संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने काम करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अहिर यांनी जेजुरी देवस्थानालाही भेट दिली. तेथील विकासनिधी आणि विविध कामांचा आढावा त्यांनी घेतला. घटनात्मक पदावर असल्यामुळे राजकीय व्यासपीठांवर काही मर्यादा पाळाव्या लागतात, मात्र पक्ष संघटनेसाठी काम



करण्यावर त्याचा परिणाम होणार नाही, असे त्यांनी नमूद केले. पुणे महापालिकेत सध्या शिवसेनेचा एकही नगरसेवक नसल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. यामागील राजकीय परिस्थिती सर्वांना ज्ञात असल्याचे ते म्हणाले. आगामी काळात पुण्यात पक्षाची ताकद वाढवण्यासाठी व्यापक संघटनात्मक बदल केले जात असून, युवासेनेतील काही पदाधिकाऱ्यांना मुख्य संघटनेत जबाबदाऱ्या दिल्या जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. विविध समाजघटकांतील आणि वंचित घटकांतील कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही अहिर यांनी सांगितले. इतर पक्षांतील नेत्यांच्या प्रवेशाबाबत विचारले असता, 'मी स्वतःहून कुणाला पक्षात आणण्याचा प्रयत्न करणार नाही. मात्र इच्छुक स्वतःहून आले तर त्यांचे स्वागत केले जाईल,' अशी भूमिका त्यांनी मांडली.

विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोरे यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रासंदर्भात योग्य तो निर्णय सरकार घेईल, असे अहिर म्हणाले. नाशिकमधील घटनेवर प्रतिक्रिया देताना, अशा घटनांची जबाबदारी स्थानिक प्रशासनाची असल्याचे त्यांनी म्हटले. शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांच्याबाबतची भूमिका ही वैयक्तिक असल्याचे स्पष्ट करत अहिर म्हणाले की, त्यांनी पक्षासाठी शेकडो सभा घेतल्या आहेत.

त्या चळवळीतील कार्यकर्त्या असल्याने पक्ष सोडणार नाहीत. पक्षाने त्यांना योग्य न्याय द्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. पालकमंत्रीपदाबाबत सुरू असलेल्या चर्चेवर भाष्य करताना, 'बॅनर लावून पालकमंत्रीपद मिळत नाही. हा निर्णय पक्षाचे वरिष्ठ नेते घेतील,' असे त्यांनी स्पष्ट केले.

## संपादकीय

# पुनर्विकासाची घर(कर)भरणी

मुंबईभर गेले कित्येक वर्षे पुनर्विकासाचे प्रकल्प सुरू आहेत. तुमची बिल्डिंग पाडली का, पत्रे लागले का, तुम्हाला किती मिळणार, प्रकल्प कुणी अडवून धरलाय... अशा प्रश्नांनीच आजकाल परिचितांमधील चर्चाही सुरू होतात. पुनर्विकासाबाबतच्या घडामोडींचा आपल्यावर काय परिणाम होणार, याची चिंता प्रत्येकाला सतावते. प्राप्तिकर, जीएसटी, मुद्रांक, मालमत्ता कर अशा विविध कर-शुल्कांच्या बाबतीत कमालीची संदिग्धता असते; परिणामी अनेकांचे कौटुंबिक जमाखर्च बिघडतात. अनपेक्षित निर्णयांमुळे प्रकल्पही टांगणीला लागू शकतात. व्यवहारसुलभतेचा कितीही पुकारा झाला, तरी प्रत्यक्ष कार्यालयांमध्ये वहाणा झिजवण्यावाचून पर्याय नसतो. हल्लीच प्राप्तिकर अपिल न्यायाधिकरणामध्ये एक निर्वाळा आला.

पुनर्विकासात मिळालेल्या सदनिकेची एखाद्याने विक्री केल्यास सदनिकाधारकाने ती मूळरूपात जेव्हा खरेदी केली होती, त्या तारखेपासून कराचा कालावधी धरून, सदनिकाविक्रीच्या रकमेचा लाभ हा दीर्घकालीन भांडवली लाभ (लाँग टर्म कॅपिटल गेन) या श्रेणीत गणला जाईल. त्याला अल्पमुदतीचा भांडवली नफ्याचा (शॉर्ट टर्मन कॅपिटल गेन) भुर्दंड पडणार नाही. सदनिकेचा ताबा मिळाल्याच्या तारखेपासून हा कालावधी मोजायचा की या मालकाने मूळ सदनिका कधी खरेदी केली होती, तेव्हापासून, यावर मतभेद होते. २०१६-१७ मध्ये या सदनिकाधारकाला प्राप्तिकर कार्यालयाकडून करसवलत नाकारण्यात आली होता. त्यावर २०२५ मध्ये न्यायाधिकरणापुढे झालेल्या अपिलात हा दिलासा मिळाला. याबाबतीत खरेतर संदिग्धतेचे कारण नव्हते. परंतु अशा अनेक बाबतीत आव्हान देऊन न्याय पदरात पाडण्यावाचून गत्यंतर नसते. सर्वांना ते शक्य नसते. पुनर्विकास योजनांमध्ये मूळ सदनिकाधारकाला जीएसटी लागू करण्याबाबतीतही अशीच मतमतांतरे आहेत. बहुतांश प्रकल्पांमध्ये करार करतेवेळी विकासक मूळ सदनिकाधारकांकडून ५ टक्के जीएसटीची रक्कम घेतात. तर काही विकासक त्यावर मौन बाळगतात, कारण प्रकल्प पुढे रेटणे त्यांना आवश्यक वाटते. स्वयंपुनर्विकास म्हणजे खरेतर आपलेच घर आपण सामग्री आणून, पैसा ओतून दुरुस्त करण्यासारखे. त्यासाठी सिमेंट, विटा, कंत्राटदार असल्यास या सर्वांवर जीएसटी लागतो. मग पुन्हा ५ टक्के जीएसटी भरणे म्हणजे दुहेरी कर. परंतु याही बाबतीत केंद्र व राज्य सरकारच्या पातळीवर सुस्पष्टता नाही. शासननिर्णय तर आला आहे, परंतु त्याचे जीएसटी विभागाकडून नोटिफिकेशन नाही, अशी स्थिती. जीएसटी परिषदेने केंद्र व राज्यांना याबाबतीत निर्देश देण्याची गरज आहे, असे सीए सांगतात. कर विभागांमध्ये आगाऊ सुनावणीसाठीही अर्ज करता येतो. परंतु निकाल विरोधात जाण्याच्या भीतीपोटी फारसे कुणी त्या फंदात पडत नाही. पुनर्विकासाच्या करारांची नोंदणी करण्याकरिता बाजारमूल्यानुसार नव्हे, तर शासननिर्णयानुसार १०० रुपयेच मुद्रांक लागले पाहिजे, या गोष्टीसाठी ग्राहक पंचायत, सोसायटी फेडरेशन यांना अतोनात पाठपुरावा करावा लागला होता. त्यातही १०० रुपये की हजार रुपये, याबद्दलचा गोंधळ होताच. व्यवसायसुलभता किंवा ईझ ऑफ डुईंग बिझनेस या शब्दांचा पुकारा तर होतो; परंतु बांधकाम क्षेत्रात ही 'सुलभता' म्हणजे संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेऊन प्रश्न सोडविणे, असाच असावा. महापालिकांच्या स्तरावरही 'एक खिडकी योजना' असे गोंडस नाव देऊनही विविध कार्यालयांकडे जावेच लागते. मध्यस्थांचे फेरे चुकत नाहीत. बांधकामांचे प्रस्ताव संगणकप्रणालीत सादर तर होतात, परंतु ज्या क्रमाने ते सादर झाले, त्यानुसार ते पुढे सरकत नाहीत. २०२१ मध्ये जागतिक बँकेने काही निकष तयार केले होते. मात्र या प्रक्रियेवरही काही आरोप-प्रत्यारोप झाल्याने ते मागे घेण्यात आले. 'महारेरा' या गृहनिर्माण क्षेत्रासंबंधी अंकुश ठेवणाऱ्या यंत्रणेच्या कार्यकक्षेत पुनर्विकास हा विषयच येत नाही, तर मग या समस्यांबाबत गोंधळलेल्या जनतेने कुणाकडे पहावे?

## गुरु वचन

### सार्थक जीवन

सुख व धर्माची स्थापना करणेच मानवी जीवनाचे लक्ष्य आहे. ईश्वराने जी शक्ती व पात्रता मानवाला दिली आहे तिचा सदुपयोग दुसऱ्यांची मदत करणे, त्याचे जीवन सुखी करण्यात आहे. शारीरिक गरजांची पुर्तता करण्यासाठी मेहनत आवश्यक आहे. जीवनातील अडचणी सोडवून जो वेळ व शक्ती मिळते त्यास विश्वकल्याणात खर्च केले पाहिजे कारण हेच सर्व शास्त्रांचे सार आहे–श्अष्टादश पुराणेषु व्यासस्य वचनं द्वयम, परोपकाराय पुण्याय पापाय पर पीडनम्श। तात्पर्य म्हणजे मनुष्य जीवनाचा उद्देश परोपकार व पुण्यच आहे. जो मनुष्य जीवनात येऊन आपली विचारसरणी व भावनांना शुष्कता, नीरसता व कठोरता सारख्या दोषातून मुक्त होऊ शकला नाही तो जीवनाच्या वास्तविक रसग्रहण करण्यापासून वंचितच राहिल.

आनंदाचा स्त्रोत चांगल्या अनुभवांमध्ये आहे. भक्ती–प्रेम–समर्पण व सत्योपासनाद्वारे ईश्वर प्राप्त करणे शक्य आहे. ज्यांचे अंत:करण शुद्ध आहे, जे भावनांना मनात स्थान देत नाही त्यांना ईश्वर प्राप्ती सहज होते. मानवी जीवनाचा बहुतांशी भाग आहार, निद्रा, भय इत्यादीत जातो. शारीरिक गरजा पुर्ण करण्यात बराच वेळ व शक्ती खर्च होते. एवढ्याच गोष्टी व्यस्त राहणे मानवी जीवनाचे लक्ष्य है? सृष्टीतील सर्व जीवांमध्ये सर्वश्रेष्ठ असल्यामुळे मानवाचे उत्तरदायित्व सुद्धा श्रेष्ठ आहे. जो आपल्या कर्तव्याकडे लक्ष देत नाही तो नक्कीच मनुष्यत्वाचा महान गौरव प्राप्त करण्याचा अधिकारी नाही. अमाप पैसा किंवा भौतिक सुख मिळवूनही जीवन खरेदी केले जाऊ शकत नाही. सद्भावच मानवाची सत्य व स्थायी संपत्ती आहे म्हणून जीवनाच्या प्रत्येक क्षणाला सद्गुण–संपादनातच खर्च करणे बुद्धिमत्ता आहे. मानवी जीवनास यशस्वी बनवणेच खरी दुरदृष्टीता आहे.

## उपदेशकथा

### रूसले कवित्व

भोजराजाची विद्वज्जनसभा खच्चून भरली होती. कवी आपल्या कविता वाचून दाखवित आपापली मते मांडीत होते. राजाही त्यात सहभागी झाला होता. तेवढ्यात द्वारपाल राजासमोर आला व त्याने लवून प्रणाम केला. बोला, काय म्हणणं आहे? राजाने विचारले. महाराज कोणी जालंदर निवासी विद्वान आपल्याला भेटण्याची इच्छा करीत आहेत, द्वारपाल नम्रपणे म्हणाला. अच्छा, जरूर आत पाठवा मग त्यांना, राजाने तत्काळ परवानगी दिली. सर्वांच्या नजरा दरवाजाकडे वळल्या. वीस–बावीस वर्षांचा एक तेजस्वी युवक दरबारात प्रवेश करीत होता. प्रत्यक्ष राजसभेत प्रवेश केल्यावर मात्र तो जरासा भांबावला. अर्थात ते साहजिकच होते. एकतर राजसभेत तो पहिल्यानेच येत होता. दुसरी गोष्ट अशी की, कालिदासासारख्या प्रतिभासंपन्न कविश्रेष्ठांच्या समोर बोलणे ही काही सामान्य गोष्ट नव्हती. शिवाय आपली आर्थिक दुरवस्था व्यक्त केल्यावर सर्वांच्या कुचेष्टाचा विषय आपण बनू की काय ही भीतीही त्याला वाटत होती. बोला, बोला ना विद्वान काहीतरी, भोजराजा म्हणाला. त्या युवकाने काही वेळ विचार केला व मग तो म्हणाला, काय सांगू महाराज, एकेकाळी माझ्या या कंठात काव्यशारदा घर करून राहिली होती ! बरं मग! राजाने विचारणा केली. पण दररोज गरमागरम कांजी प्राशन करावी लागत असल्यामुळे की काय, पोळून जाण्याच्या भीतीने तिनं तेथून पळ काढला आहे. आपल्या दारिद्र्याचे त्याने केलेले ते काव्यमन वर्णन ऐकून राजासह सर्व विद्वज्जन खूष झाले. हा युवक विलक्षण प्रतिभासंपन्न आहे हे पाहून राजाने तर कविजनांप्रमाणेच त्याचा सत्कार केला. कांजीऐवजी दररोज त्याला सुमधुर जेवण घेता यावे व काव्यशारदा परत त्याच्या कंठात विराजमान व्हावी यासाठी राजाने लक्ष मोहरा दिल्या.

कथा उपदेश : गुण ओळखणारी व त्याचे चीज करणारी माणसे असतात.

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०३०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 3 | | 5 | | | |
| | 5 | 7 | | | | 3 | 2 | 8 |
| | 9 | 6 | | 8 | 2 | | 7 | |
| | | 8 | | | 3 | | | 6 |
| | | 5 | 6 | 4 | 1 | 8 | | |
| 6 | | | 8 | | | 2 | | |
| | 4 | | 5 | 9 | | 7 | 6 | |
| 8 | 7 | 3 | | | | 9 | 5 | |
| | | | 4 | | 7 | | | |

: सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०२९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | 9 | 3 | 7 | 4 | 1 | 6 | 5 |
| 6 | 1 | 5 | 9 | 8 | 2 | 4 | 7 | 3 |
| 3 | 7 | 4 | 1 | 5 | 6 | 8 | 2 | 9 |
| 5 | 3 | 7 | 4 | 6 | 9 | 2 | 1 | 8 |
| 1 | 8 | 2 | 7 | 3 | 5 | 9 | 4 | 6 |
| 9 | 4 | 6 | 8 | 2 | 1 | 5 | 3 | 7 |
| 2 | 9 | 8 | 6 | 1 | 3 | 7 | 5 | 4 |
| 4 | 5 | 3 | 2 | 9 | 7 | 6 | 8 | 1 |
| 7 | 6 | 1 | 5 | 4 | 8 | 3 | 9 | 2 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५७८ – अल कस्र अल कबिरच्या लढाईत पोर्तुगालचा राजा सेबास्टियाव पहिला मृत्युमुखी.
- १७८९ – फ्रांसच्या राष्ट्रीय सभेने जहागिरदारीची पद्धत बंद करण्याचे ठरवले.
- १८२४ – कोसची लढाई.

### राष्ट्रीय

- १९२३ – नागपूर विद्यापीठाची स्थापना.
- १९५६ – भारतातील पहिली 'अप्सरा' ही अणुभट्टी तुर्भे येथे सुरू झाली.
- १९६९ – भारतातील १४ प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा ठराव लोकसभेत मंजूर.
- १९७१ – मूलभूत हक्कांसकट घटनेत कुठलीही दुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेत देणारी २४वी घटनादुरुस्ती लोकसभेत मंजूर.
- २००४ – अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून खून केलेल्या धनंजय चटर्जीचा दयेचा अर्ज राष्ट्रपतींनी फेटाळला.


### जन्म

- १५२१ – पोप अर्बन सातवा.
- १७९२ – पर्सी शेली, ईंग्लिश कवी.
- १८०५ – विल्यम रोवन हॅमिल्टन, आयरिश गणितज्ञ.
- १८३५ – जॉन व्हेन, इंग्लिश गणितज्ञ.
- १८४५ – फिरोजशहा मेहता, काँग्रेसचे नेते व 'मुंबईचे सिंह' म्हणून ओळखले जाणारे थोर पुरुष.
- १८९४ – ना. सी. फडके, प्रसिद्ध कथा–कादंबरीकार यांचा.

### निधन

- १३०६ – वेंकेस्लॉस तिसरा, बोहेमियाचा राजा.
- १५७८ – सेबास्टियाव पहिला, पोर्तुगालचा राजा.
- १८७५ – हॅन्स अँडरसन, जगातील प्रसिद्ध परीकथा लेखक.

## संस्कृत सुभाषित



सुखा अंग देऊ नये ।
प्रयत्न पुरुष सांडू नये
अर्थ : धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थाची प्राप्ती हवी तर परिश्रम केलेतच पाहिजे.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.८ | २४ |
| अहमदनगर | ३१.५ | २२.८ |
| अकोला | ३६.२ | २४.६ |
| अमरावती | ३३.७ | २५.१ |
| बीड | ३९.५ | २५.२ |
| भंडारा | ३८.५ | २५.७ |
| बुलढाणा | ४५ | २६.९ |
| चंद्रपूर | ३९.२ | २५.९ |
| चेन्नई | ४३.१ | ३० |
| नवी दिल्ली | ४३.६ | ३१.७ |
| धुळे | ३५.५ | २५.४ |
| गोंदिया | ३७.४ | २५.९ |
| जळगाव | ३४.६ | २४.१ |
| कोल्हापूर | २७.२ | २२.१ |
| लातूर | ३३.१ | २३.२ |
| मुंबई | ३३.८ | ३२.५ |
| नागपूर | ३७.६ | २४.३ |
| नांदेड | ३५.८ | २४.३ |
| नंदूरबार | ३१ | २५.३ |
| नाशिक | २७ | २२.८ |
| पुणे | २६.१ | २२.६ |
| पंढरपूर | ३५ | २४.७ |
| सातारा | २९.८ | २१.१ |
| सांगली | ३२ | २२.८ |
| सोलापूर | ३५.३ | २४.१ |
| वर्धा | ३७.९ | २५ |

## पंचांग



| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:रेवती २१:५३:४९ |
| ४ ऑगस्ट २०२६ | योग:धृति १९:३२:४४ |
| मंगळवार | करण:गर १०:३२:४८ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:वणिज २२:०३:३२ |
| आषाढ शके | सूर्य:कर्क |
| संवत्– १९४८ | चन्द्र:मेष२१:५३:४९ |
| संवत्सर –पराभवनाम | हिजरी सन् – १४४८ |
| अयन– दक्षिणयन | मुस्लिम मास – सफर |
| मास– आषाढ | तारीख – २० |
| ऋतु– सौर वर्षा | विशेष |
| कृष्ण पक्ष | रामजीबाबा पुण्यतिथी |
| तिथि:षष्टी २२:०३:३२ | – मोर्शी (अमरावती) |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** सतत पाहुण्यांची वर्दळ राहील. आपली इच्छापूर्ती होणाऱ्या घटना घडतील. योग्य व्यक्तीच्या मार्गदर्शनाचा लाभ होईल.

**वृषभ :** जाणीवपूर्वक आपल्या विचारात बदल करण्याचा प्रयत्न करावा. गुंतवणूकीतून लाभ होतील. जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलावा.

**मिथुन :** मित्रपरिवाराचे चांगले सहकार्य लाभेल. मित्रपरिवाराबरोबर वेळ मजेत घालवाल. कुटुंबात आपल्या मतांचा आदर केला जाईल.

**कर्क :** आपल्या राशीतून गुरुचे तर सप्तमस्थानातून शुक्रचे होणारे भ्रमण विवाहेच्छूक तरुणांना मनपसंत जोडीदार मिळवून देईल.

**सिंह :** कुटुंबात सुसंवाद साधलात तरच निभाव लागणार आहे. खरेदी कराल. उच्चशिक्षणासाठी प्रवेश मिळेल. शैक्षणिक क्षेत्रात प्रगती साधता येईल.

**कन्या :** धार्मिक स्थळांना भेटी द्याल. बौद्धीक व कला क्षेत्रातून चांगला फायदा होईल. घरात धार्मिक शुभसमारंभाचे आयोजन केले जाईल.

**तुळ :** गृहसुशोभिकरणासाठी शोभेच्या वस्तूंची खरेदी कराल. सांस्कृतिक कार्यक्रमातून आनंद घ्याल.

**वृश्चिक :** घरातील दुर्लक्षित कामांसाठी वेळ देता येईल. आपले कार्यक्षेत्र विस्तृत करण्याचा प्रयत्न कराल. नोकरीत केलेल्या प्रयत्नांना यश येईल.


**धनु :** घरातील सुखसुविधा वाढविण्याकरीता इलेक्टॉनिक्सच्या वस्तूंची खरेदी केली जाईल. इच्छा, अपेक्षा कृतीत आल्याने समाधान लाभेल.

**मकर :** प्रवासातून कार्यसिद्धी होईल. कौटुंबिक सौख्य लाभेल. स्थावर मालमत्तेच्या व्यवहारातून लाभ होतील. महिला स्वत:च्या पद्धतीने गृह सजावट करतील.

**कुंभ :** गाठीभेटी होतील. मनातील कल्पना आकारात घेतील.परदेशातील भावंडांशी सल्लामसलत करुन महत्वाचे निर्णय घेतले जातील.

**मीन :** चांगल्या विचारांमुळे जीवन सुकर होण्यास मदत होईल. सुसंवाद साधाल. कला, साहित्य क्षेत्रातील लोकांना नवीन संधी उपलब्ध होतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०३०



**आडवे शब्द**

१. अरण्य
३. बोलविणे
६. एक श्वासरोग
८. हार
११. संगीतसम्राट
१२. शाळेतील शिक्षक
१४. अंत:करण
१५. नम्र, वाकलेला
१७. आवळ्याची चव
१०. दार
२१. झोप, निंद्रा
२२. अवस्था
२४. पृथ्वी
२६. तिन्ही लोकात फिरणारा मुनी
२८. विपुलता, रेलचेल
२९. गणपती
३१अ. हिंदीत प्रार्थना
३३. म्हणीतील त्रिदल
३४. चेष्टा करणारा
३५. अधिक महिना
३७. पर्ण, ३८. दाट, ढग
३९. रडून गोंधळ
४०. दर्पण, ४२. वर्ष, सण
४३. माझे
४४. दोषच्या विरुद्ध
४५. प्राज्ञा, हिंमत
४६. जुळे
४८. वाड्यातील मधली खोली
५०. अंदाज, तर्क
५२. मनातील काळेबेरे
५३. त्रास
५५. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री
५७. ओरखडा
५८. व्यवसाय, व्यापार
५९. खोडकरम द्वाड (हिंदी)
६०. मज्जाव
६१. धन्यवादाचा शब्द
६३. सैन्याचा दाणागोटा
६५. संतोष, तृप्ती
६७. भार, बोजा
६९. नाश पावणे
७१. धनी, स्वामी
७३. ढग (संस्कृत)
७५. बांगड्याचा व्यवसाय करणारा
७७. चामखीळ
७९. कुत्र्याला केलेली आज्ञा
८०. जाणणे, परिचित असणे
८१. तृण
८२. मजबूत
८. नरक, यमपुरी
८४. भांडण

**उभे शब्द**

१. वन्य, रानटी
२. वेल
३. दक्षिणेच्या समुद्रापासून ते उत्तरेच्या हिमालयापर्यंत
४. काळ्या तोंडाचे माकड
५. धुंदी, कैफ
६. थांबून थांबून
७. शिक्षक
९. कौसल्यापुत्र
१०. जन्मदात्री
१३. पाठविलेला
१६. पर्वत
१८. चेष्टा, टिंगल
२०. शत्रूच्या नाशाचे मंत्रतंत्र
२३. तमाशात काम करणारा
२५. लाकडाची एक उत्कृष्ट जात
२७. मालमत्ता
३०. कानाखाली काढण्याची आग!
३१. नमस्कार, वंदन
३२. अधिकार नसताना हुकूम गाजवणारा
३४. पत्र
३६. एकटा
३८. सुगंधाची दरवळ
४०. आपला परका अशी भावना
४१. मलई
४२. सोज्वळ, प्रामाणिक
४३. मला
४५. धातूवरील देव प्रतिमा
४७. निवडणुकीपुरता आठवणारा
४९. चेहऱ्यावरील तेज
५१. मागणे
५४. गरीबांवर दया करणारा
५६. चालू काळ
६०. मनातील इच्छा दाबणे
६२. चंद्र
६४. मनातील टोचणारे दु:ख
६६. शहाण, हुशार (हिंदी)
६८. पुरुष
७०. खूप, पुष्कळ
७२. पाण्यावरील तेलाचा थर
७४. ओलसर हवा
७६. मधुमेहींसाठी ही कडूच!
७८. उत्सव
८०. रांग

**जम्बो शब्दकोडे क्र. १०२९ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.फयान ४.पदरमोड ८.नवरा १०.चमत्कार ११.हातचलाखी १३.रक्षक १४.वासना १५.रामा १६.वारा १७.रान १८.काया २०.गो २१.तरुणी २२.टीकाकार २५.रतन २७.मळमळ २८.जस्त ३०.नामदार ३२.जळवात ३४.मनन ३६.वाचा ३८.पाया ३९.फारकत ४०.रत ४२.कपाळ ४३.जननमरण ४५.मस्त ४७.नगर ४८.तप ५०.तग ५१.स्तवनीय ५३.आळ ५४.तबक ५६.कथानक ५८.नायनाट ५९.सरकार ६२.उपकार ६३.बलक ६५.विळी ६६.परात ६७.दमदाटी ६९.बटन ७०.आभार ७२.तडकसार ७३अ.जग ७४.वसाहत ७४अ.फरीदा ७५.कणीदार

उभे उत्तर : १.सनसनाटी २.याचक ३.नम ४.परवानगी ५.रचनाकार ६.डहाळी ७.कचरा ८.नखी ९.राजाराणी ९अ.घरघंटी १२.लामा १६.वारुळ १९.यातना २१.तमस २३.काजळ २४.रजत २६.नमस्कार २७.मरवा २९.जनक ३१.छाया ३२.जळजळ ३३.वाहनतळ ३४.मरणयातना ३५.नतमस्तक ३७.चाकरचुकर ३८.पाळत ३९.फार ४१.तनय ४४.मग ४६.स्तव ४९.पदक ५२.नीरस ५३.आपपरभाव ५५.बटबटीत ५७.नजरानजर ५८.नारद ६०.रविवार ६१.काळी ६४.कथेकरी ६६.पट ६८.मदत ६९.बरणी ७१.रसा ७२अ.डफ ७३.सादा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



## पोवाडा आजही समाजशिक्षणाचे प्रभावी माध्यम : मिलिंद कांबळे

**पुणे : दैनिक संध्या**

स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी तसेच राष्ट्रउभारणीसाठी लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम म्हणून कीर्तन आणि पोवाड्याचा वापर केला. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या प्रभावीपणे पोवाड्याच्या माध्यमातून लोकशिक्षण झाले, त्याचप्रमाणे आजही पोवाडा हे समाजशिक्षणाचे प्रभावी माध्यम असल्याचे मत डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे मिलिंद कांबळे यांनी व्यक्त केले. शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी, पुणे यांच्या पोवाडा प्रशिक्षण वर्गांतर्गत लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शनिवार पेठेतील न्यू इंग्लिश स्कूल रमणबागमधील कलाग्राम येथे 'लोकमान्य-लोकशाहीरा, घ्या मानाचा मुजरा' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रबोधिनीचे अध्यक्ष आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे उपस्थित होते. त्यानंतर आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे आणि सेवाव्रती यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या शाहिरी रचनांचे सादरीकरण केले. मिलिंद कांबळे म्हणाले, लोकमान्य टिळक यांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रयत्न केले. तसेच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी पारंपरिक शालेय शिक्षण न घेता पोवाडा आणि लेखणीच्या माध्यमातून लोकशिक्षणाचे महत्त्वपूर्ण कार्य केले. लोकमान्य टिळक यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले, तर लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी राष्ट्रउभारणीत मोलाचा वाटा उचलला. या दोन्ही राष्ट्रीय नेत्यांनी पोवाड्यासारख्या प्रभावी माध्यमाचा लोकजागृतीसाठी वापर केला. ते पुढे म्हणाले, पोवाडा हे माध्यम आजही प्रभावी आहे. काळानुसार तंत्रज्ञान बदलत असून डिजिटल माध्यमांचा प्रभाव वाढत आहे. अशा परिस्थितीत डिजिटल माध्यमातून पोवाड्याचे प्रशिक्षण देणे तसेच पोवाड्याच्या माध्यमातून लोकजागृती आणि लोकशिक्षण घडविणे आवश्यक आहे. यासाठी शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी कार्यरत असून या कार्याची समाजाला निश्चितच गरज आहे.



## अवयव दानाबाबत जनजागृतीसाठी प्रयत्न करण्याची गरज : खासदार मेधा कुलकर्णी

**पुणे : दैनिक संध्या**

देशात दर वर्षी सुमारे पाच लाख रुग्णांचाअवयव उपलब्ध न झाल्याने मृत्यू होत असल्याचे सांगत, ब्रेन-डेड व्यक्तींच्या अवयव दानामुळे अनेकांना जीवनदान मिळू शकते, तर देहदानामुळे वैद्यकीय शिक्षण व संशोधनाला मोठी मदत होते. अवयवदानाबाबतचे अज्ञान, अंधश्रद्धा आणि चुकीच्या समजुती दूर करण्यासाठी अवयवदानाबाबत समाजात सातत्याने विविध पातळीवर जनजागृती होण्याची गरज आहे असे मत खासदार सौ. मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केले. ३ऑगस्ट हा राष्ट्रीय अवयव दिन म्हणून साजरा केला जातो. त्याच्या पूर्वसंध्येला आज "देहांगदान प्रबोधन महाचर्चा" व डॉ. श्रीपाद कोटबागी यांना "जीवन व्रत वंदना पुरस्कार" इंडियन मेडिकल असोसिएशन, पुणे व दि फेडरेशन ऑफ ऑर्गन अँडबॉडी डोनेशन मुंबई (फेडरेशन) यांच्या संयुक्त विद्यमाने आय.एम.ए. हाऊस, पुणे येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला खासदार सौ. मेधा कुलकर्णी, फेडरेशन चे पुरुषोत्तम पवार अध्यक्ष, सुनील देशपांडे उपाध्यक्ष, आय.एम.ए. च्या अध्यक्षा डॉ. सौ. अलका क्षीरसागर, डॉ अनिकेत जोशी सचिव, डॉ. सौ. मीनाक्षी देशपांडे, डॉ. सौ. कामाक्षी भाटे, डॉ. अरुण हळबे, डॉ. श्रीपाद कोटबागी आणि सौ. उषाताई कोटबागी उपस्थित होते. सौ. मेधा कुलकर्णी यांनी अवयवदानासाठी कार्यरत संस्था, कार्यकर्ते आणि रुग्णालयांच्या योगदानाचे कौतुक केले. नियमांमध्ये एकवाक्यता, पारदर्शकता आणि जनसहभाग वाढविण्यासाठी आवश्यक त्या पातळीवर सहकार्य करण्याची तयारी व्यक्त केली. अशा उपक्रमांमुळे अवयवदानाची संख्या वाढेल, असा विश्वास व्यक्त करून आयोजकांचे अभिनंदन केले. पवार म्हणाले "अवयवदानासाठीच्या आपल्या मनातील शंकाचे निरसन करणे व त्यासाठी जनजागृती करणे हे आमच्या फेडरेशनचे ध्येय आहे. अवयवदान करणे हे माझे कर्तव्य आहे आणि ते मी करीनच"असा संकल्प प्रत्येकाने केल्यास अवयवासाठी प्रतीक्षित कोणीही मृत पावणार नाही.

## स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी पर्यायी मार्गांचाही विचार करावा : डॉ. दिलीप शेठ

**पुणे : दैनिक संध्या**

आजच्या स्पर्धेच्या युगात अनेक विद्यार्थी नैराश्याच्या गर्तेत सापडत असल्याचे चित्र दिसते. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना स्वतःसाठी निश्चित कालमर्यादा ठरवावी आणि नेहमी प्लॅन बी तयार ठेवावा. पहिल्या प्रयत्नात यश मिळाले नाही, तरी दुसरा पर्याय सज्ज असणे आवश्यक आहे. स्वतःतील वेगळे गुण ओळखून त्यांना योग्य दिशा दिल्यास यश निश्चित मिळते. त्याचबरोबर शारीरिकदृष्ट्याही सक्षम राहणे तितकेच महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या लोकमान्य टिळक अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप शेठ यांनी केले. अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक-पुणे केंद्राच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार, विद्यार्थी शिष्यवृत्ती व मराठी, संस्कृतमध्ये पीएचडी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा सदाशिव पेठेतील ब्राह्मण मंगल कार्यालय येथे संपन्न झाला. यावेळी प्रमोद वजगडे, अनिल शिदोरे, संस्थेचे कार्याध्यक्ष अनिल देशपांडे, कार्यवाह अ‍ॅड. सुहास भणगे, केंद्र प्रमुख सुजाता मवाळ, कार्यवाह अमृत श्रोत्री, शैक्षणिक प्रमुख राजाभाऊ गुंड, मंदार रेडे, शरद गर्भे, जगदिश नगरकर इ. निरनिराळ्या संस्थांचे पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते. यावेळी गणित - उमा राम गोंधळेकर, संस्कृत - प्राजक्ता केळकर बर्वे, मराठी - मंजिरी मिलिंद पाटणकर, क्रीडा - जयवंत बोडके, कबड्डी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच ३० विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने शिष्यवृत्ती देण्यात आली. शाल, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. तसेच संस्कृत व मराठीमध्ये विशेष नैपुण्य मिळालेले विद्यार्थी बीए मराठी रोहिणी गोरे, चंद्रकांत अरुण इंगवले, बीए संस्कृत चिन्मय कुलकर्णी, ओवी जोशी, एमए मराठी दत्तात्रय शेळके, शुभम दातखिळे, एमए संस्कृत स्वरदा उमेश लोवलेकर, सर्वेश उमेश भडेकर, पीएचडी मराठी उज्वला काळभोर, पीएचडी संस्कृत मुग्धा चंद्रात्रे यांचा देखील सन्मान यावेळी करण्यात आला.

### प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या वाढदिवसानिमित्त

# आदर्श विद्यालयातील विद्यार्थिनींना छत्र्यांचे वाटप

■ पुणे (दै. संध्या)



सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या मालिकेअंतर्गत पुण्यातील 'आदर्श विद्यालय' प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या पावसाळ्यातील सुरक्षिततेला प्राधान्य देत त्यांच्या शिक्षणप्रवासाला हातभार लावण्याच्या उद्देशाने हा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला.

शिक्षणाबरोबरचसामाजिकबांधिलकी, संवेदनशीलता आणि समाजहिताची जाणीव जोपासत विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी करणे आणि समाजात सेवाभावाची प्रेरणा निर्माण करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. या कार्यक्रमावेळी आदर्श विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नीलिमा लांजेवार, शाळेतील सर्व शिक्षिका, तसेच राम घायतिडक (पाटील), पुणे जिल्हा सरचिटणीस प्रदीप घाडगे, नरसिंग भंडारी आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करत 'सूर्यदत्त'चे आभार मानले.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त '६५ वर्षे - ६५ समाजोपयोगी उपक्रम' या संकल्पनेतून 'सूर्यदत्त'च्या उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया यांच्या मार्गदर्शनात अनेक सेवाभावी उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक विकास या क्षेत्रांमध्ये सकारात्मक योगदान देण्याचा सूर्यदत्तचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, म्हणाले, "वाढदिवस हा केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नसून, समाजाप्रती आपली जबाबदारी अधिक दृढ करण्याची संधी असते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलविणे, त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासात छोटासा का होईना हातभार लावणे, हीच माझ्यासाठी सर्वात मोठी भेट आहे.

समाजातील प्रत्येक घटकाने शिक्षण, संस्कार आणि सेवाभाव या त्रिसूत्रीच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे, हीच सूर्यदत्तची भूमिका आहे."

सुषमा चोरडिया म्हणाल्या, "मुलींचे शिक्षण, सुरक्षितता आणि आत्मविश्वास वृद्धिंगत करणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप हा उपक्रम मुलींना त्यांच्या शिक्षणप्रवासात समाज त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे, हा विश्वास देण्याचा प्रयत्न आहे. समाजातील गरजू विद्यार्थ्यांसाठी सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन सातत्याने कार्यरत राहील."

## पुण्यात खड्ड्यांचे साम्राज्य

■ पुणे (दै. संध्या)

शहरात सुरु असलेल्या संततधार पावसामुळे रस्त्यांवरील खड्ड्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र महापालिकेकडून रस्ते दुरुस्तीचे केवळ सोपस्कार पार पाडले जात आहेत. दुरुस्त केलेले खड्डे २४ तासही टिकत नाहीत. परिणामी चालकांवर जीव मुठीत घेऊन वाहने चालविण्याची वेळ आली असून खड्ड्यांमुळे शहरात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. शहरात वेगवेगळ्या ठिकाणी पाणी पुरवठा, ड्रेनेज, विद्युत वाहिन्यांसह विविध सेवा कामांसाठी खोदलेले रस्ते तातडीने दुरुस्त करा, महत्वाच्या कामांव्यतिरीक्त रस्ते खोदाईस परवानगी देऊ नका, असे आदेश महापालिका आयुक्तांनी महापालिका प्रशासनास दिले होते. त्यानंतरही ऐन पावसाळ्यात ठिकठिकाणी खोदाईची कामे सुरु होती. तर, खोदाई करण्यात आलेले रस्ते, पदपथ व्यवस्थित दुरुस्त करण्यात आले नाहीत. परिणामी शहरातील मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांवर देखील मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. संबंधित खड्ड्यांमुळे शहरातील वाहतुकीचा वेग प्रचंड मंदावला असल्याची सद्यःस्थिती आहे.

# आपल्या घरातील तरुण बिथरणार नाही याची काळजी घ्या

### ज्येष्ठ विधीज्ञ नंदू फडके : पुणे सार्वजनिक सभेतर्फे सार्वजनिक काका पुरस्कार वितरण सोहळा

■ पुणे (दै. संध्या)

सद्यस्थितीत देशाचे वातावरण ढवळून निघाले आहे. राष्ट्रनिष्ठ लोक चिंतीत आहेत. आपल्या घरातील तरुण मुलांशी आपला योग्य संवाद झाला पाहिजे. ते बिथरले जाणार नाहीत यासाठी आपण वेळ देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एक सामान्य माणूस म्हणून आपण ताठ मानेने उभे राहायचे आहे. तेव्हाच आपण सार्वजनिक काका आणि वासुदेव बळवंत यांना महान म्हणू शकतो, असे मत ज्येष्ठ विधीज्ञ नंदू फडके यांनी व्यक्त केले.





पुणे सार्वजनिक सभेचे संस्थापक गणेश वासुदेव जोशी उपाख्य सार्वजनिक काका यांच्या तिथीनुसार पुण्यतिथी निमित्ताने त्यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा सार्वजनिक काका पुरस्कार हिंदू विधीज्ञ परिषद अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर यांना प्रदान करण्यात आला. यावेळी नंदू फडके बोलत होते. अरणेश्वर चौकातील सुपर्ण कार्यालय येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विद्याधर नारगोलकर, सचिव शरद गर्भे, कार्याध्यक्ष अनिल शिदोरे, धनाजी चेन्ने, अनंत मोडक, अंजली वैद्य, वसंत जोशी, बाळ भिंगारकर, सुरेश कालेकर यांसह विश्वस्त आणि कार्यकारणी सदस्य उपस्थित होते. संस्थेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे गरीब होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक शिष्यवृत्ती देण्यात आली. नंदू फडके म्हणाले, ज्या राष्ट्राने आपला इतिहास विसरला, ते राष्ट्र इतिहासजमा होते. त्यामुळे इतिहास विसरणे नव्हे, तर इतिहासातून स्फूर्ती घेणे आवश्यक आहे. हिंदू धर्मावर अनेक आक्रमणे झाली; पण हिंदू समाज टिकून राहिला. अनेक परकीय समाज भारतात आले. तरीही हिंदू धर्म नष्ट झाला नाही. मुसलमानांनी अनेक मंदिरे पाडली, मूर्तींचा विध्वंस केला; पण हिंदू समाज नष्ट झाला नाही. उलट तो अधिक सक्षमपणे टिकून राहिला. याचे कारण म्हणजे मंदिर निर्मितीसाठी भक्कम मनोवृत्ती तेव्हा भक्कम होती. परंतु मागील ७५ वर्ष ही स्थिती निराळी झाली आहे. सत्तारुढ पक्ष जो होता तो शांतता प्रिय समाजाला नेहमी झुकते माप देत होता. आजही देत आहे. वीरेंद्र इचलकरंजीकर म्हणाले, डावे लोक प्रत्यक्षात ग्राउंडवर काहीही काम करत नाहीत. सामान्य माणसाच्या गरजेवर काहीही काम करत नाहीत. आणि व्यवस्था दूषित करतात. वैचारिक दहशतवादाच्या विरोधात लढण्याची जबाबदारी पुढच्या पिढीची आहे. हिंदुराष्ट्राकडे जी वाटचाल आहे ती इतकी सोपी नाही, असेही त्यांनी सांगितले. अनिल शिदोरे म्हणाले, समाजामध्ये अनेक व्यक्ती विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करत असतात; मात्र त्यांचे कार्य समाजापर्यंत पुरेशा प्रमाणात पोहोचत नाही. अशा व्यक्तींना सार्वजनिक सभेच्या व्यासपीठावर आणून त्यांचा सन्मान करणे, त्यांच्या कार्याचा गौरव करणे ही संस्थेची भूमिका आहे.

याच उद्देशाने काही गुणवंत विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येत आहे. २ एप्रिल १८७० रोजी सार्वजनिक सभेची स्थापना झाली. त्या काळात सामाजिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक प्रश्नांवर समाजाला एकत्र आणणे, विविध विषयांवर चर्चा घडवून आणणे आणि समाजाची भूमिका प्रभावीपणे मांडणे हा संस्थेच्या स्थापनेमागील मुख्य उद्देश होता. स्वातंत्र्यानंतर देशातील प्रश्नांचे स्वरूप बदलले आणि त्यानुसार सार्वजनिक सभेच्या कार्यपद्धतीतही काळानुरूप बदल करण्यात आले. आजही समाजहिताच्या विविध उपक्रमांद्वारे संस्था कार्यरत आहे. विद्याधर नारगोलकर यांनी मनोगत व्यक्त केले. विजय मराठे यांनी सूत्रसंचालन केले.

## अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर यांना 'सार्वजनिक काका पुरस्कार' प्रदान !

■ पुणे (दै. संध्या)

'पुणे सार्वजनिक सभा' या ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या संघटनेकडून हिंदु विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर यांना ज्येष्ठ विधीज्ञ नंदू फडके यांच्या हस्ते 'सार्वजनिक काका पुरस्कार' देण्यात आला. हिंदु धर्मावर विविध माध्यमातून होणाऱ्या आघातांविरोधात कायदेशीर लढा देऊन हिंदुत्वाचे रक्षण करण्याचे व्यापक कार्य ते करत असल्याविषयी त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



या प्रसंगी पुणे सार्वजनिक सभेचे अध्यक्ष श्री. विद्याधर नारगोलकर, कार्यवाहक श्री. शरद गर्भे, कार्याध्यक्ष श्री. अनिल शिदोरे आणि अन्य पदाधिकारी, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे यांसह अनेक राष्ट्र-धर्मप्रेमी नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचा आरंभ दीपप्रज्ज्वलनाने झाला. त्यानंतर पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात प्रतिवर्षीप्रमाणे काही होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक शिष्यवृत्ती देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. श्री. अनिल शिदोरे यांनी पुणे सार्वजनिक सभेचा इतिहास सांगत संघटनेच्या कार्याची माहिती दिली. या वेळी ज्येष्ठ विधीज्ञ नंदू फडके अन् श्री. रमेश शिंदे यांचाही सत्कार करण्यात आला. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. श्री. विद्याधर नारगोलकर यांनी दोन्ही अधिवक्त्यांची वैशिष्ट्ये सांगत 'पुणे सार्वजनिक सभेला पुढील काळात राष्ट्र-धर्माचे कार्य करतांना विधी साहाय्य लागल्यास दोन्ही अधिवक्ता कायम उभे रहातील' असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचा शेवट आभार प्रदर्शन आणि वन्दे मातरम् गायनाने झाला.

आज भारतामध्ये झालेले सीजेपीचे आंदोलन म्हणजे गंभीर घटना आहे. देशविरोधी घोषणा, अशलाघ्य आणि अश्लील टीका करणारे हे युवक पाहून राष्ट्रभक्त नागरिक चिंतेत आहेत. स्वातंत्र्यानंतर आलेल्या सरकारने शांतताप्रिय समाजाला कायम झुकते माप दिले. अनेक दशकांमध्ये हिंदूंचा बुद्धीभेद केला गेला. या सर्व गोष्टींमुळेच आज हे संकट आपल्यासमोर आहे. देशात राहून देशविरोधी कार्य करणाऱ्या छुप्या शत्रूंपासून आपण सावध व्हा. ही देशद्रोही विचारसरणी नष्ट होण्यासाठी हिंदूंचे संघटित आंदोलन उभे करावे लागेल.

मला मिळालेला हा पुरस्कार त्यांच्यासाठी आहे, जे हिंदुत्वरक्षणासाठी विधी क्षेत्रात प्राणपणाने लढत आहेत. त्यांचा प्रतिनिधी म्हणून जरी हा पुरस्कार स्विकारत असलो, तरी या पुरस्काराने माझ्यावरील राष्ट्र-धर्म रक्षणाचे दायित्व आणखी वाढले आहे. आज देशभरात फोफावलेल्या वैचारिक आतंकवादाविरोधात लढायला हवे आणि 'विधी' हे मोठे शस्त्रच आहे.

हिंदूंवर होणाऱ्या आघातांची वारंवारता पहाता हिंदुत्वासाठी लढणाऱ्या अधिवक्त्यांची संख्या सहस्रोंच्या संख्येने वाढायला हवी. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मी आवाहन करतो की, ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली त्यांनी आणि एकूणच पुढील पिढीने अधिवक्ता क्षेत्रात येऊन राष्ट्र अन् धर्माचे रक्षण करावे.

## मास-मार्केट स्कूटरच्या लॉन्चची पुष्टी

■ पुणे (दै. संध्या)


एथर एनर्जीचे सीईओ आणि सहसंस्थापक तरुण मेहता यांनी पुष्टी केली आहे की कंपनीचा पहिला मास-मार्केट इलेक्ट्रिक स्कूटर, जो नवीन ईएल प्लॅटफॉर्मवर आधारित आहे, तो 29 ऑगस्ट रोजी बेंगळुरूमध्ये होणाऱ्या एथर कम्युनिटी डे मध्ये लॉन्च होणार आहे. एक्स वर ही घोषणा शेअर करताना मेहता यांनी सांगितले की नवीन स्कूटर म्हणजे उत्तम इलेक्ट्रिक स्कूटरची ओळख ठरवणाऱ्या कोर टेक्नॉलॉजी आणि आर्किटेक्चरमध्ये अनेक वर्षांच्या गुंतवणुकीचा परिपाक आहे."आम्ही अनेक वर्षांपासून चांगल्या स्कूटरसाठी आवश्यक असलेल्या बिल्डिंग ब्लॉक्समध्ये संयमाने गुंतवणूक करत आलो आहोत," मेहता यांनी लिहिले. "दहा वर्षांनंतर ईव्ही टू-व्हीलर्स आता अर्ली अडॉप्टर स्टेजच्या पुढे जाण्यास तयार आहेत. टेक्नॉलॉजी सर्वांसाठी तयार आहे, फीचर्स सर्वांसाठी महत्त्वाचे होत आहेत.


# स्वामी चिंचोली एक ऐतिहासिक वारसा

■ पुणे (दै. संध्या)

पुण्यापासून फक्त 2 तासांच्या अंतरावर पुणे - सोलापूर हायवे वर स्वामी चिंचोली या गावात इनामदार यांचे पेशवेकालीन श्रीराम मंदिर आहे.

सुमारे 300 वर्षांपूर्वी श्रीमंत बाजीराव पेशवे (पाहिले) हे दक्षिणेकडील महत्वाच्या लढाईला जात असताना प. पू. तुकाराम स्वामी यांची चिंचोली येथे गाठ पडली व श्री. तुकाराम स्वामी च्या आशीर्वादाने पेशव्यांनी ही अवघड लढाई जिंकली. या उपकाराची परतफेड म्हणून तुकाराम स्वामी च्या आज्ञेवरून पेशव्यांनी सुमारे १७३० साली चिंचोली येथे अतिशय शांत व प्रसन्न वाटावे अशा श्रीराम मंदिराची उभारणी केली. प.पू. तुकाराम स्वामीच्या नावाच्या वलयामुळे या गावाचे नाव स्वामींची चिंचोली अर्थात स्वामी चिंचोली असे रूढ झाले. तसेच पेशव्यांनी मंदिराच्या देखभाली साठी आजूबाजूची ५





गावे ही इनाम म्हणून दिली. या वतनामुळे पुढच्या पिढीत इनामदार हे आडनाव रूढ झाले. दरवर्षी इनामदार श्रीराम मंदिरात श्रीराम नवमी अतिशय उत्साहात साजरी केली जाते. दरवर्षी रामनवमीला लाखो भाविक श्रीरामाचे दर्शन घेण्यासाठी इनामदार श्रीराम मंदिरात येतात. स्वामी चिंचोली येथील मंदिर विशेष म्हणजे राम, लक्ष्मण व सीता त्यांच्या संगमरवरी मूर्ती असून समोरच स्वयंभू असा दास मारुती आहे. त्याचप्रमाणे मंदिरात दुर्मिळ अशी पंचमुखी शंकराची पिंडी आहे तसेच बिभीषणाची ही दुर्मिळ संगमरावरी मूर्ती आहे.

अपत्य प्राप्तीसाठी "नवसाला पावणारा श्रीराम" अशी अनेकांना प्रचिती आल्याने हे श्रीराम मंदिर प्रसिद्ध आहे. त्यामुळे नव परिणीता रामनवमीच्या दिवशी रामजन्मानंतर राम बाळ ओटीत घेण्यासाठी वेगळी रांग करतात. यावर्षी श्रीराम जानकी चॅरिटेबल ट्रस्ट व इनामदार कटुंबियांच्या वतीने मंदिराचे जीर्णोद्धाराचे काम हाती घेण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात शिखर व कळस यांचा जीर्णोद्धार करण्यात येणार आहे. त्यासाठी अंदाजे 25 लाख रु. खर्च अपेक्षित आहे. भाविकांना नम्र विनंती आहे की त्यांनी यथाशक्ती आर्थिक देणगी देऊन हातभार लावावा आणि हे पवित्र कार्य पूर्ण करण्यास सहकार्य करावे. देणगी साठी सोबत QR कोड दिलेला आहे. कोणतीही रक्कम छोटी नसते परंतु सदभावना महत्वाची असते. आपण नक्की सहकार्य कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो. नेहमीप्रमाणे या वर्षी ही श्रीराम नवमीच्या उत्सवाची सुरुवात गुढी पाडव्याला रामाचे नवरात्र बसवून झाली. त्यांनतर अष्टमी ला सकाळी समर्थ सप्रदायास अनुसरून भिक्षेची फेरी निघते. नंतर रात्री छबीना निघतो. यामध्ये वेशीपर्यंत फेरी निघते आणि त्यात श्रीरामाच्या वेगवेगळ्या आरत्या व नांनाविध पदे उत्साहात गायली जातात. श्रीराम नवमी ला पवमान अभिषेक, रुद्र इ. ने रामाची पूजा आरंभ होते. नंतर ह.भ. प. सौ. मोहना नातू यांनी नारदीय कीर्तन अतिशय प्रभावी पणे सादर केले. त्यानंतर रामजन्म सोहळा पार पडला व भाविकांनी दर्शन घेण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती. रामनवमीच्या रात्री प्रथेप्रमाणे रामाची पालखीतून मिरवणूक काढली गेली. यावेळेस ग्रामस्थांनी नानाविध पदे गायली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी दशमीला सकाळी मंदिरात प्रसन्न राघवाची पूजा होऊन उत्सवाचा समारोप झाला. यावेळेस राम जन्माच्या वेळी सुप्रसिद्ध राष्ट्रसंत व समर्थ भक्त श्री. मोहनबुवा रामदासी यांची असलेली उपस्थिती व इंदापूरचे माजी खासदार डॉ. हर्षवर्धन पाटील यांची उपस्थिती हे विशेष होते. यावर्षी इनामदार कुटुंबीय व इनामदारांचा श्रीराम जानकी चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत सुमारे ५००० लोकांना उपवास खिचडीचा प्रसाद व तेवढ्याच लोकांना बिसलेरी पाणी वाटप केले गेले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### ड्रीमे टेक्नॉलॉजीचा 'डी३० अल्ट्रा' रोबोट व्हॅक्यूम भारतात दाखल

**मुंबई : दैनिक संध्या**

स्मार्ट होम तंत्रज्ञान क्षेत्रातील ड्रीमे टेक्नॉलॉजीने भारतात नवीन 'ड्रीमे डी३० अल्ट्रा' रोबोट व्हॅक्यूम सादर केला आहे. २५ हजार पास्कल सक्शन क्षमता, बुद्धिमान मॉपएक्सटेंड तंत्रज्ञान आणि स्वयंचलित देखभाल केंद्रासह विविध अत्याधुनिक सुविधा या उपकरणात देण्यात आल्या आहेत. घरातील साफसफाई अधिकाधिक स्वयंचलित करून मानवी हस्तक्षेप कमी करण्याच्या उद्देशाने हे उपकरण विकसित करण्यात आले आहे. ड्रीमे डी३० अल्ट्राची किंमत ५२ हजार ९९९ रुपये ठेवण्यात आली आहे. हे उत्पादन ॲमेझॉनवर उपलब्ध असून १ ऑगस्टपासून ड्रीमे इंडियाच्या अधिकृत संकेतस्थळासह क्रोमा आणि निवडक किरकोळ दुकानांमध्येही उपलब्ध होणार आहे. ड्रीमे इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक मनू शर्मा म्हणाले, "भारतीय कुटुंबांकडून स्मार्ट जीवनशैलीचा स्वीकार वाढत असल्यामुळे वापरकर्त्यांच्या गरजांशी जुळवून घेणाऱ्या स्वयंचलित घरगुती उपकरणांची मागणी वाढत आहे. डी३० अल्ट्रामध्ये प्रभावी स्वच्छता क्षमता आणि बुद्धिमान स्वयंचलित तंत्रज्ञानाचा मेळ घालण्यात आला आहे. त्यामुळे दैनंदिन कामांमध्ये वापरकर्त्यांचा वेळ वाचण्यास मदत होईल."




### हुमा कुरेशी आणि भूमि पेडणेकर 'लॉक अप: सच या सज़ा' मध्ये दाखल

**मुंबई : दैनिक संध्या**

नेटफ्लिक्सचा जागतिक स्तरावर ट्रेंडिंग कॅप्टिव्ह रिॲलिटी शो 'लॉक अप: सच या सज़ा' अंतिम आठवड्यात प्रवेश करत असताना, कोर्टरूममध्ये दोन उत्साही नवीन आवाजांचे स्वागत झाले. ह्यूमा कुरेशी आणि भूमी पेडणेकर यांनी 'जनता की आवाज' म्हणून 'लॉक अप' मध्ये प्रवेश केला. हाय-स्टेक्स जजमेंट डे मध्ये त्यांनी कैद्यांना भेट दिली, प्रेक्षकांनी वाट पाहिलेल्या प्रश्नांची उत्तरे विचारली आणि त्यांच्या गेमप्लेला कसून तपासलं. फिनाले जवळ येत असताना आणि प्रत्येक निर्णयाचे परिणाम अधिक गंभीर होत असताना, ह्यूमा आणि भूमी यांनी 'लॉक अप' मध्ये एका महत्त्वाच्या टप्प्यावर प्रवेश केला. बदलणारी समीकरणं, न सुटलेली स्पर्धा, कैद्यांचा प्रवास आणि त्यांचा गेमप्ले या सर्वांवर त्यांनी स्वतःच्या दृष्टिकोनातून प्रश्न विचारले. जजमेंट डे मध्ये कठीण प्रश्न, थेट संवाद आणि अनपेक्षित क्षणांची भर पडली. आपल्या भेटीबद्दल बोलताना ह्यूमा कुरेशी म्हणाली, "लॉक अप हा खूपच अप्रतिम शो आहे. सध्या हा सर्वात व्हायरल शो आहे. मी तो फक्त नेटफ्लिक्सवरच नाही तर रील्समधूनही फॉलो करते. माझा इंस्टाग्राम अल्गोरिदम 'लॉक अप' ने भरलेला आहे. भूमी पेडणेकर म्हणाली, "मी 'लॉक अप' फॉलो करते आणि मला म्हणावं लागेल की नेटफ्लिक्सने आम्हाला पूर्णपणे एंटरटेन केलं आहे. मला कैद्यांना प्रत्यक्ष भेटायला खूप उत्साह होता. मी प्रश्न विचारले आणि माझ्या मनात असलेल्या सर्व शंका दूर केल्या. रितेश आणि फराह हे खूपच शानदार होस्ट्स आहेत. शोचा मजेदार भाग मोठ्या प्रमाणात त्यांच्यामुळेच येतो. ते कठीण प्रश्न विचारतात आणि ही जागा खूपच कठीण आहे स्पर्धकांना मार्गदर्शन आणि शिस्त लावणं पण त्यांनी ते खूपच उत्तमरीत्या केलं आहे." फिनाले आठवडा सुरू होताच आणि अंतिम रेषेपर्यंतची शर्यत तीव्र होत असताना, काही कैद्यांना ह्यूमा आणि भूमी यांनी कठीण प्रश्न विचारले. त्यांच्या भेटीमुळे गेममध्ये सर्वात महत्त्वाच्या क्षणी बदल झाला असण्याची शक्यता आहे. 'लॉक अप: सच या सज़ा' नेटफ्लिक्सवर दररोज, शनिवार ते शुक्रवार, रात्री 8 वाजता स्ट्रीमिंग होत आहे.

### एमके२५० ब्ल्यूटूथ कॉम्बोची सुरुवात

**मुंबई : दैनिक संध्या**

लॉजिटेक (सिक्स: एलओजीएन) (नॅसडॅक:लॉजी) तर्फे आज त्यांच्या ऑल न्यू अशा एमके २५० ब्ल्यूटूथ माऊस आणि कीबोर्ड कॉम्बो सह के २५० ब्ल्यूटूथ कीबोर्ड ची भारतात सुरुवात करत असल्याची घोषणा करण्यात आली. या नवीन सुरुवातीमुळे लॉजिटेक ने आता त्यांच्या विश्वसनीय गुणवत्तेसह डिझाईन मधील कुशलता परवडणाऱ्या कॉम्बो मध्ये आणले असून पहिल्यांदाच वायरलेसचा वापर करणाऱ्यांसाठी सुयोग्य उपकरणे आणली आहेत. या आधुनिक आणि कॉम्पॅक्ट उत्पादनांचे डिझाईन अशा लोकांसाठी आहे जे कोणतीही तडजोड न करता, अजोड ब्ल्यूटूथ कनेक्टिव्हिटीसह आरामदायकता आणि स्वच्छ, टिकाऊ डिझाईन सह कामा बरोबरच रोजचे मल्टिटास्किंग करु इच्छितात. कार्यक्षमता आणि सहजतेचा परिपूर्ण संगम शोधणाऱ्या वापरकर्त्यांसाठी एमके २५० कॉम्बो अतिशय योग्य आहे, बहुआयामी अशा के २५० ब्ल्यूटूथ कीबोर्ड सह एम १९६ वायरलेस माऊस ही जोडी अतिशय परिपूर्ण आणि आधुनिक सेटअप साठी उत्तम आहे. यामुळे जोडी पूर्ण होऊन आधुनिक सेटअप सह सोपा, परवडणारा आणि रोजच्या कार्यक्षमतेसाठी उत्तम पर्याय ठरतो. त्यातील स्टॅन्डआऊट वैशिष्ट्यांसह के २५० ब्ल्यूटूथ की बोर्ड असून या कॉम्बो मध्ये एम १९६ माऊस चे डिझाईन हे दोन्ही हातांनी माऊसचा वापर करणाऱ्यांसाठी करण्यात आले आहे. एम १९६ माऊस मुळे आरामदायक, अचूक नेव्हिगेशन हे आरामदायक ऑप्टिकल ट्रॅकिंग आणि फ्लुईड लाईन बाय लाईन स्क्रोलिंग साठी योग्य आहे. विश्वसनीय आणि टिकाऊ अशी ही एमके २५० कॉम्बोची जोडी १२ महिन्यांच्या बॅटरी लाईफ सह दोन्ही माऊस आणि की बोर्डना देते.

# तुंबाडची मंजुळा'चा ७ ऑगस्टला मराठी ZEE5 वर डिजिटल प्रीमियर

**■ जितेंद्र जोशी, ओम भुतकर, मकरंद अनासपुरे, सई ताम्हणकर आणि उषा नाडकर्णी यांच्या प्रमुख भूमिका**

**■ मुंबई (दै. संध्या)**

वर्षातील मोठ्या मराठी चित्रपटांपैकी एक ठरलेल्या 'तुंबाडची मंजुळा'चा जागतिक डिजिटल प्रीमियर ७ ऑगस्ट रोजी मराठी ZEE5 वर होणार आहे. चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांचे प्रेम मिळवल्यानंतर भय, विनोद, नाट्य आणि भावनिक कथानकाची सांगड घालणारा हा चित्रपट आता डिजिटल माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

विविध कोरगांवकर दिग्दर्शित आणि झी स्टुडिओज निर्मित 'तुंबाडची मंजुळा'मध्ये जितेंद्र जोशी, ओम भुतकर, मकरंद अनासपुरे, सई ताम्हणकर आणि उषा नाडकर्णी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. भय-विनोद प्रकारातील या चित्रपटात मनोरंजनासोबत अंधविश्वास, सामाजिक पूर्वग्रह आणि माणुसकीचा संदेशही अधोरेखित करण्यात आला आहे.




**भीती, विनोद अन् नाट्याची खमंग फोडणी**

चित्रपटाची कथा केशव या पात्राभोवती फिरते. केशव आपल्याला मंजुळा नावाच्या महिलेच्या आत्म्याने झपाटल्याचे खोटे सांगतो. त्याच्या या एका खोट्यामुळे संपूर्ण गावात गोंधळ उडतो. स्वतःची प्रतिष्ठा वाचवण्यासाठी सुरू झालेला खेळ पुढे भुतांच्या कथा, अंधश्रद्धा आणि अनपेक्षित घटनांच्या मालिकेत बदलतो. त्यातून निर्माण होणाऱ्या विचित्र परिस्थिती प्रेक्षकांना हसवतानाच कथेला भय आणि भावनांची किनार देतात.

चित्रपटाबाबत ZEE मराठीच्या चीफ चॅनल ऑफिसर आणि मराठी ZEE5च्या बिझनेस हेड हेमा व्ही. आर. यांनी सांगितले की, 'तुंबाडची मंजुळा' मराठी ZEE5 वर आणताना आनंद होत आहे. भीतीदायक थरार आणि पोट धरून हसायला लावणाऱ्या विनोदाचे मिश्रण असलेला हा चित्रपट संपूर्ण कुटुंबासाठी मनोरंजनाची मेजवानी ठरेल. कोकणच्या पार्श्वभूमीवर साकारलेली कथा आणि कलाकारांचा अभिनय प्रेक्षकांना नक्कीच गुंतवून ठेवेल.

दिग्दर्शक विविध कोरगांवकर म्हणाले की, प्रेक्षकांचे मनोरंजन करतानाच समाजाला आकार देणाऱ्या श्रद्धा आणि धारणांवर भाष्य करणारा चित्रपट तयार करण्याचा सुरुवातीपासून प्रयत्न होता. चित्रपटगृहांमध्ये मिळालेल्या प्रेमानंतर आता ZEE5च्या माध्यमातून हा चित्रपट अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार असल्याचा आनंद आहे.

अभिनेता जितेंद्र जोशी म्हणाला की, केशवच्या एका छोट्याशा खोट्यामुळे अकल्पनीय गोंधळ निर्माण होतो आणि त्यातूनच या पात्राचा प्रवास अधिक मनोरंजक बनतो. चित्रपटगृहांतील प्रेक्षकांचा प्रतिसाद उत्साहवर्धक होता आणि आता हा चित्रपट आणखी मोठ्या प्रेक्षकवर्गापर्यंत पोहोचणार असल्याचा आनंद आहे. सई ताम्हणकरनेही चित्रपटातील विनोद, भय आणि भावनांच्या मिश्रणाचे वैशिष्ट्य अधोरेखित केले. मनोरंजनासोबतच प्रेक्षकांना विचार करण्यासाठी काहीतरी अर्थपूर्ण देणारी ही कथा असून प्रेक्षक आपल्या कुटुंबासोबत या चित्रपटाचा आनंद घेतील, असा विश्वास तिने व्यक्त केला. भुतांची धमाल, गावातील गोंधळ, भावनिक प्रसंग आणि अनपेक्षित वळणांनी सजलेला 'तुंबाडची मंजुळा' ७ ऑगस्टपासून मराठी ZEE5 वर पाहता येणार आहे.

## योग्य वेळेची वाट पाहण्यापेक्षा नियमित गुंतवणुकीवर भर

**■ नवी दिल्ली (दै. संध्या)**

भारतातील रिटेल गुंतवणुकीचा प्रवास आता नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे. संपत्ती निर्माण करणे ही आता एक सवय होऊ लागली आहे. प्रथमच गुंतवणूक करणारे बहुतांश गुंतवणूकदार शिस्तबद्ध गुंतवणुकीचा स्वीकार करत असल्यामुळे, दैनंदिन एसआईपी हा दीर्घकालीन संपत्ती निर्मितीचा प्रभावी पर्याय म्हणून पुढे येत आहे. दररोज केवळ ₹10 पासून गुंतवणूक करण्याची सुविधा उपलब्ध करून देत, फोनपे म्युच्युअल फंड्सने गुंतवणुक सुरू करण्याच्या मार्गातील अडथळा कमी केला आहे. त्याचबरोबर गुंतवणुकीतील एक मूलभूत तत्त्वही अधिक अधोरेखित केले आहे : योग्य वेळ साधण्यापेक्षा सातत्यपूर्ण गुंतवणूक अधिक महत्त्वाची. याचे प्रतिबिंब फोनपे म्युच्युअल फंड्सच्या दैनंदिन एसआईपी च्या आकडेवारीतून स्पष्टपणे दिसून येते. डिसेंबर 2025 मध्ये ही सुविधा सुरू झाल्यापासून या प्लॅटफॉर्मवर दैनंदिन एसआईपी करणाऱ्या 5 लाखांहून अधिक गुंतवणूकदारांनी नोंदणी केली आहे. यावरून छोट्या-छोट्या रकमेची, पण सातत्याने केली जाणारी गुंतवणूक स्वीकारण्याची प्रवृत्ती वेगाने वाढत असल्याचे दिसून येते. 2026 मध्ये या सुविधेला आणखी वेग मिळाला आहे. जानेवारी 2026 ते जून 2026 या कालावधीत फोनपे म्युच्युअल फंड्सच्या दैनंदिन एसआईपी च्या व्यवहारांमध्ये जवळपास 5 पट वाढ झाली. सरासरी ₹50 इतक्या गुंतवणुकीसह, दीर्घकालीन संपत्ती निर्मितीसाठी दैनंदिन एसआईपी ही प्रभावी आर्थिक सवय ठरत असल्याचे दिसून आले आहे. ही गुंतवणुकीची सवय आता भारतातील महानगरांपुरती मर्यादित राहिलेली नसल्याचेही या आकडेवारीतून स्पष्ट होते. दैनंदिन SIPमध्ये गुंतवणूक करणारे सुमारे 77% गुंतवणूकदार हे बी30 शहरांमधील (टियर-2 आणि टियर-3 शहरांमधून) आहेत. यावरून टियर-2, टियर-3 आणि छोट्या शहरांमध्येही नियमित गुंतवणुकीला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येते.

## 'कोना कोना शिक्षा' उपक्रमातून वित्तीय साक्षरतेचे धडे

**आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये २९३ शहरांतील ९०९ महाविद्यालयांमधील ७२ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोच**

**■ मुंबई (दै. संध्या)**

कोटक सिक्युरिटीज लिमिटेडने आपल्या प्रमुख सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम 'कोना कोना शिक्षा'च्या माध्यमातून जुलै २०२१ पासून देशभरातील सुमारे ३.६ लाख तरुणांना वित्तीय साक्षरतेचे ज्ञान दिले आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये या उपक्रमाद्वारे २९३ शहरांतील ९०९ महाविद्यालयांमधील एकूण ७२ हजार ६२४ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोच साधण्यात आली.

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्सच्या (एनआयएसएम) भागीदारीत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. तरुणांमध्ये आर्थिक व्यवहारांविषयी जागरूकता निर्माण करून त्यांना योग्य आणि जबाबदार आर्थिक निर्णय घेण्यासाठी सक्षम करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी १० तासांचा संरचित अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. यामध्ये वैयक्तिक वित्त व्यवस्थापन, गुंतवणुकीची मूलतत्त्वे, सिक्युरिटीज मार्केट आणि आर्थिक नियोजन अशा महत्त्वाच्या विषयांचा समावेश आहे. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे ऑनलाइन मूल्यमापन केले जाते आणि त्यांना एनआयएसएमचे प्रमाणपत्रही देण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक तसेच उद्योग क्षेत्राशी संबंधित वित्तीय कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळत आहे.

कोटक सिक्युरिटीजचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीपाल शाह म्हणाले, "लोकांना माहितीपूर्ण आर्थिक निर्णय घेण्यास मदत करणे हे आमच्या कार्याच्या केंद्रस्थानी आहे. सातत्याने बदलणाऱ्या आर्थिक वातावरणात वित्तीय साक्षरतेची सुरुवात लवकर होणे आवश्यक आहे. 'कोना कोना शिक्षा'च्या माध्यमातून आम्ही तरुण भारतीयांना जबाबदारीने आर्थिक निर्णय घेण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि आत्मविश्वास देत आहोत. या कार्यक्रमाला मिळणारा उत्साहवर्धक प्रतिसाद आमची बांधिलकी अधिक मजबूत करतो."

एनआयएसएमचे संचालक सशी कृष्णन म्हणाले, "कोना कोना शिक्षाच्या सातत्यपूर्ण परिणामाचा आम्हाला अभिमान आहे. कोटक सिक्युरिटीजसोबतच्या भागीदारीमुळे लाखो तरुण भारतीयांना आवश्यक वित्तीय ज्ञान आणि कौशल्ये देता आली आहेत. दरवर्षी मिळणारा उत्स्फूर्त सहभाग आणि सकारात्मक प्रतिसाद वित्तीय साक्षरतेची वाढती गरज अधोरेखित करतो. या कार्यक्रमाचा आणखी विस्तार करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत." कोटक सिक्युरिटीजच्या शिक्षणकेंद्रित सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांमध्ये 'कोना कोना शिक्षा' हा प्रमुख कार्यक्रम ठरला आहे. तरुणांना आर्थिकदृष्ट्या अधिक जागरूक आणि सक्षम बनविण्यासोबतच दीर्घकालीन सकारात्मक बदल घडविण्याच्या दिशेने या उपक्रमाची वाटचाल सुरू असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

## रोगांविरोधात बायरचे 'झिवाना™ स्मार्ट' बुरशीनाशक सादर

**डाऊनी मिल्ड्यू आणि लेट ब्लाइट रोगांवर नियंत्रण; द्राक्षांसह बटाटा, टोमॅटो व काकडीवर्गीय पिकांसाठी उपयुक्त**




**■ मुंबई (दै. संध्या)**

बागायतदार शेतकऱ्यांना पिकांवरील विनाशकारी रोगांचा प्रभावीपणे सामना करता यावा यासाठी बायरने पुढच्या पिढीतील 'झिवाना™ स्मार्ट' हे नवीन बुरशीनाशक सादर केले आहे. डाऊनी मिल्ड्यू आणि लेट ब्लाइट यांसारख्या रोगांपासून उच्च मूल्याच्या फलोत्पादन पिकांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने हे उत्पादन विकसित करण्यात आले आहे.

एफआरएसी गट ४९ अंतर्गत असलेल्या नवीन सक्रिय घटकाच्या साहाय्याने 'झिवाना™ स्मार्ट' द्राक्षे, काकडीवर्गीय पिके, बटाटा आणि टोमॅटोमधील रोगांवर प्रभावी नियंत्रण देते. त्यामुळे पिकांची गुणवत्ता टिकविणे, उत्पादकता सुधारणे आणि शेतकऱ्यांचा परतावा वाढविण्यास मदत होणार असल्याचे कंपनीने म्हटले आहे. तसेच रोगांमध्ये प्रतिरोधकता विकसित होण्याचा धोका कमी करण्याच्या दृष्टीने हे उत्पादन विकसित करण्यात आले आहे. डाऊनी मिल्ड्यू आणि लेट ब्लाइट हे फलोत्पादन पिकांवर परिणाम करणाऱ्या विनाशकारी रोगांपैकी प्रमुख रोग आहेत. या रोगांच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांच्या पीक संरक्षणावरील खर्चाचा मोठा हिस्सा खर्च होतो. बदलते हवामान आणि दीर्घकाळ टिकणारी आर्द्रता यामुळे या रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने दीर्घकाळ संरक्षण देणाऱ्या उपायांची आवश्यकता वाढली आहे. कंपनीच्या माहितीनुसार, 'झिवाना™ स्मार्ट'ची आधुनिक कार्यपद्धती ऊमायसीट रोगांविरुद्ध प्रभावी ठरते. पावसाळी वातावरणातही हे उत्पादन सरासरी ७ ते १४ दिवसांपर्यंत संरक्षण देऊ शकते. पावसाचा परिणाम कमी होणे तसेच आधीची पाने आणि नव्याने होणारी वाढ या दोन्हींचे संरक्षण करण्याच्या क्षमतेमुळे संपूर्ण पीक चक्रात रोगांचे व्यवस्थापन करणे शेतकऱ्यांना शक्य होणार आहे. बायरच्या पीक विज्ञान विभागाचे भारतातील मुख्य कार्यकारी अधिकारी मोहन बाबू म्हणाले, "भारताच्या पोषण सुरक्षेसाठी आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी फलोत्पादन महत्त्वाचे आहे. 'झिवाना™ स्मार्ट'च्या माध्यमातून बायर विज्ञानकेंद्री नवसंशोधन आणत आहे. यामुळे फलोत्पादक शेतकऱ्यांना रोगांच्या गुंतागुंतीच्या समस्यांचे व्यवस्थापन करण्यास, पिकांची गुणवत्ता जपण्यास आणि अधिक लवचिक व शाश्वत अन्नप्रणाली उभारण्यास मदत होईल." 'झिवाना™ स्मार्ट' महाराष्ट्रासह कर्नाटक, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान, आसाम, आंध्र प्रदेश आणि पंजाब या प्रमुख फलोत्पादक राज्यांमध्ये उपलब्ध होणार आहे. नावीन्यपूर्ण पीक संरक्षण उपायांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची उत्पादकता वाढविणे आणि शाश्वत शेतीला चालना देण्याच्या बायरच्या प्रयत्नांचा 'झिवाना™ स्मार्ट' हा पुढील टप्पा असल्याचे कंपनीने म्हटले आहे.



## ओडिशा AM/NS इंडिया खो-खो हाय परफॉर्मन्स सेंटरचा दुसरा वर्धापन दिन उत्साहात

**■ दोन वर्षांत ३० हून अधिक स्पर्धांमध्ये सहभाग घेत ४८ पदकांची कमाई; निवड चाचणीतून १९ नव्या खेळाडूंना प्रवेश**

**■ भुवनेश्वर/पुरी (दै. संध्या)**

ओडिशा AM/NS इंडिया खो-खो हाय परफॉर्मन्स सेंटरने पुरी येथे आपला दुसरा वर्धापन दिन उत्साहात साजरा केला. यावेळी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा गौरव करण्यात आला. तसेच 'खो-खो निवड चाचणी २०२६'च्या माध्यमातून १९ नवोदित खेळाडूंना सेंटरमध्ये प्रवेश देण्यात आला. देशातील खो-खो खेळातील गुणवंत खेळाडूंना घडविण्यासाठी आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया आणि ओडिशा सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने हे सेंटर सुरू करण्यात आले आहे. खेळाडूंच्या प्रशिक्षणाबरोबरच खो-खोसाठी पंचांना प्रशिक्षण देणे आणि त्यांचा विकास करण्याचे कामही या सेंटरच्या माध्यमातून केले जाते. गेल्या दोन वर्षांत सेंटरच्या खेळाडूंनी खो-खो विश्वचषक २०२५, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा २०२५, खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धा २०२५, कनिष्ठ राष्ट्रीय खो-खो अजिंक्यपद स्पर्धा २०२४-२०२६, वरिष्ठ राष्ट्रीय खो-खो अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२०२६ आणि उपकनिष्ठ राष्ट्रीय खो-खो अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२०२६ अशा विविध महत्त्वाच्या स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

सेंटरच्या खेळाडूंनी दोन वर्षांच्या कालावधीत ३० हून अधिक राष्ट्रीय, प्रादेशिक आणि राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभाग घेत विविध गटांत ४८ पदके पटकावली आहेत. पद्धतशीर प्रशिक्षण आणि मोठ्या स्पर्धांचा अनुभव यामुळे खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण करता आली आहे.

AM/NS इंडियाच्या मनुष्यबळ आणि प्रशासन विभागाचे संचालक व उपाध्यक्ष आशुतोष तेलंग म्हणाले, "अवघ्या दोन वर्षांत या सेंटरने खो-खोमधील पद्धतशीर प्रशिक्षण आणि गुणवत्ता विकासाचे प्रमुख केंद्र म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचे यश त्यांच्या समर्पणाबरोबरच उभारण्यात आलेल्या मजबूत व्यवस्थेचे प्रतीक आहे. जागतिक स्तरावर भारताची खो-खोमधील मान उंचावणारे विजेते खेळाडू घडविण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत."

# कॉग्निझंटकडून भारतातील १० हजार कर्मचाऱ्यांसाठी 'ओपनएआय कोडेक्स हॅकेथॉन'

**पुण्यासह सहा शहरांत आयोजन; आगामी काळात ५० हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांपर्यंत उपक्रम विस्तारण्याचे उद्दिष्ट**

**■ नवी दिल्ली (दै. संध्या)**

पुणे : कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञान सेवा क्षेत्रातील कॉग्निझंटने ओपनएआयच्या सहकार्याने प्रथमच जागतिक स्तरावरील 'कोडेक्स हॅकेथॉन'चे आयोजन केले. 'इंजिनिअरिंग द फ्रंटियर' या संकल्पनेवर आधारित या हॅकेथॉनमध्ये पुण्यासह चेन्नई, हैदराबाद, बेंगळुरू, कोईम्बतूर आणि कोची या सहा शहरांतील कॉग्निझंटचे सुमारे १० हजार कर्मचारी सहभागी झाले आहेत.

या उपक्रमाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना ओपनएआय कोडेक्सचा वापर करून शिकणे, प्रयोग करणे आणि विविध व्यावसायिक समस्यांवर कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपाय विकसित करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. कोडेक्स-बॅज प्राप्त व्यावसायिकांचा समूह वाढविणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित कौशल्यांचा प्रत्यक्ष व्यावसायिक वापर करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

यापूर्वी कॉग्निझंटला कृत्रिम बुद्धिमत्ता निर्मिती क्षमतांसाठी ओपनएआयकडून मान्यता मिळाली होती. जगभरातील उद्योग क्षेत्रातील ग्राहकांवर कोडेक्सचा होणारा परिणाम मोजण्यासाठी निवडण्यात आलेल्या आघाडीच्या जागतिक प्रणाली एकत्रीकरण कंपन्यांमध्ये कॉग्निझंटचा समावेश करण्यात आला आहे. ओपनएआयच्या स्ट्रॅटेजिक ग्लोबल पार्टनरशिप अँड इकोसिस्टम्सचे उपाध्यक्ष कोलीन कापसे म्हणाले, "कॉग्निझंट आपल्या कार्यबलामध्ये मोठ्या प्रमाणावर कोडेक्सचा वापर वाढवत आहे. त्यामुळे भारतातील १० हजार कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान शिकण्याची, त्यावर प्रयोग करण्याची आणि नवीन उपाय तयार करण्याची संधी मिळत आहे. उद्योग क्षेत्रातील ग्राहकांसाठी या कौशल्यांचे व्यावहारिक उपायांमध्ये रूपांतर करण्याच्या कॉग्निझंटच्या महत्त्वाकांक्षेतील हा हॅकेथॉन महत्त्वाचा पहिला टप्पा आहे."

कॉग्निझंट इंडियाचे अध्यक्ष (ग्लोबल ऑपरेशन्स), चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक राजेश वारियर म्हणाले, "कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षमतेसोबत मानवी निर्णयक्षमतेची सांगड घालणे हे उद्योगांना अपेक्षित परिणाम मिळवून देण्यासाठी महत्त्वाचे आहे. भारतात जागतिक कोडेक्स हॅकेथॉन आयोजित करणे हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सूचना**

म.रा.वि.वि.कं.मर्या, पुणे स्थापत्य मंडलांतर्गत असलेल्या पुणे स्थापत्य विभागांतर्गत बाह्यस्त्रोताद्वारे कुशल व अकुशल मनुष्यबळ पुरवण्यासाठी पात्र व नोंदणीकृत संस्थांकडून ई-निविदा पद्धतीने दोन बोली स्वरूपात निविदा आमंत्रित करत आहोत. सदरील निविदा क्र SEC/PUNE / PCD/T-05/2026-27 असून कामाचे स्वरूप, मनुष्यबळ संख्या, निर्दिष्ट क्षेत्र, अंदाजीत निविदा रक्कम, बयाना रक्कम इ. तपशीलांसाठी संकेतस्थळ https://etender.mahadiscom.in/eatApp/ पहावे. सदरील निविदा दि.०४.०८.२०२६ ते दि.११.०८.२०२६, १३:०० वाजेपर्यंत इलेक्ट्रॉनिक स्वरुपात उपलब्ध आहे. निविदा शुल्क ऑनलाईन भरून दि.११.०८.२०२६, १५:०० वाजेपर्यंत अपलोड करता येईल. अधिक माहितीसाठी संपर्क ७८७५७६७८१४. निम्नस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे / रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवला आहे. निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा फेरनिविदा या बाबत फक्त संकेत स्थळावरील "announcements" मध्येच कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

PRO No. 97

अधीक्षक अभियंता, स्थापत्य पुणे स्थापत्य मंडळ

# नागरिकांनी सुनावणीदरम्यान सूचना व हरकती नोंदवाव्यात

- नियोजनबद्ध शहर विकासासाठी महापालिकेचे आवाहन
- प्रारूप सुधारित विकास योजनेवर ऑगस्ट पासून डिसेंबर दरम्यान होणार सुनावण्या
- नागरिकांच्या सहभागातून शहराचा विकास आराखडा अधिक सक्षम होणार : अभिषेक बारणे स्थायी समिती सभापती



■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहराच्या नियोजनबद्ध, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासासाठी तयार करण्यात आलेल्या प्रारूप विकास आराखडा २०२६ संदर्भात नागरिकांनी आपल्या हरकती व सूचना नोंदवून सुनावणी प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने केले आहे. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना व हरकतींचा विचार करून शहराच्या भविष्यातील विकासाला दिशा देणारा आराखडा अधिक सक्षम करण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची स्थापना ११ ऑक्टोबर १९८२ रोजी झाली. स्थापनेच्या वेळी शहराचे क्षेत्रफळ ८६ चौ.कि.मी. होते, ते आज सुमारे १७६ चौ.कि.मी. झाले आहे. २००१ मध्ये सुमारे १० लाख असलेली लोकसंख्या २०११ मध्ये १७ लाखांपर्यंत पोहोचली असून, वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि लोकसंख्या यामुळे शहरांवरील ताणही वाढला आहे. अशा परिस्थितीत नियोजनबद्ध विकासासाठी विकास आराखडा अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

महानगरपालिकेचा प्रारूप विकास आराखडा १५ मे २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आला असून त्यावरील हरकती व सूचनांबाबत ऑगस्ट ते डिसेंबर २०२६ या कालावधीत सुनावण्या होणार आहेत. या प्रक्रियेत नागरिकांनी शांततेने आणि रचनात्मक पद्धतीने आपली मते मांडून महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रारूप विकास आराखड्यामध्ये पुढील २० वर्षांचा विचार करून निवासी, व्यापारी, औद्योगिक, सार्वजनिक, शैक्षणिक आणि हरित क्षेत्रांचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय रस्ते, जलपुरवठा, जलनिस्सारण, सार्वजनिक सुविधा, उद्याने, क्रीडांगणे, आरोग्य सुविधा, आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक जागा तसेच मनोरंजन सुविधांचे नियोजन करण्यात आले आहे. यामुळे शहराचा विकास शिस्तबद्ध, सुरक्षित आणि नागरिकाभिमुख पद्धतीने होण्यास मदत होणार आहे.

नियोजनबद्ध विकासामुळे वाहतूक कोंडी कमी करणे, रुंद रस्ते, पदपथ, सायकल ट्रॅक, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, पर्यावरण संरक्षण, पूरप्रवण क्षेत्रांचे नियोजन, औद्योगिक विकास, रोजगारनिर्मिती, सामाजिक सुविधा आणि आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येते. त्यामुळे विकास आराखडा हा केवळ जमिनींचे आरक्षण निश्चित करणारा दस्तऐवज नसून शहराच्या भविष्यातील विकासाचा मार्गदर्शक दस्तऐवज आहे.

यावेळी प्रारूप सुधारित विकास योजना नियोजन समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे, समिती सदस्य संदीप कस्पटे व सारिका कस्पटे, उपसंचालक नगररचना ललित खोब्रागडे, उपसंचालक नगररचना (डी.पी.) अनुपमा कुलकर्णी, निवृत्त सहसंचालक प्रकाश भुक्ते, निवृत्त उपसंचालक उत्तरेश्वर लोंढे, दत्तात्रय पवार तसेच वास्तुरचनाकार व पर्यावरण तज्ज्ञ नरसू श्रीपती शिंदे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

> “विकास आराखडा हा शहराच्या पुढील अनेक वर्षांच्या विकासाची दिशा ठरवणारा महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. नागरिकांनी सुनावणी प्रक्रियेत सहभागी होऊन आपल्या सूचना व हरकती मांडाव्यात. नागरिकांच्या सहभागातून अधिक संतुलित, सर्वसमावेशक आणि लोकाभिमुख विकास आराखडा तयार करण्यासाठी समिती कटिबद्ध आहे.”
> - अभिषेक बारणे, अध्यक्ष, प्रारूप सुधारित विकास योजना नियोजन समिती

## थोडक्यात पण महत्वाचे



### लोकमान्य टिळक, अण्णाभाऊ साठे व मधुकरराव पवळे यांना अभिवादन

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे दिवंगत माजी महापौर दिवंगत मधुकरराव पवळे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस व पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत आयोजित कार्यक्रमात लोकमान्य टिळक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि दिवंगत मधुकरराव पवळे यांच्या प्रतिमांना तसेच निगडी येथील भक्ती-शक्ती चौकातील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर,नगरसदस्य निलेश तरस,नगरसदस्या अनुराधा गोरखे,सुप्रिया चांदगुडे, मधुरा शिंदे, ऐश्वर्या तरस, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, माजी नगरसदस्य सचिन चिखले,माजी नगरसदस्या सुमन पवळे,विशेष अधिकारी किरण गायकवाड विविध पदाधिकारी तसेच दिवंगत मधुकरराव पवळे यांचे नातेवाईक लांडे, सुनिता चोरघे, रेणुका उत्तेकर, ज्योती गवारे, राजलक्ष्मी चोरघे, ओंकार पवळे,विनित गवारे आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रनिर्माणातील योगदानाचे, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक समता, परिवर्तन आणि साहित्य क्षेत्रातील कार्याचे तसेच माजी महापौर दिवंगत मधुकरराव पवळे यांनी पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाचे स्मरण करून त्यांना आदरांजली अर्पण केली. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आदर्श घेऊन समाजहित व शहर विकासासाठी कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

### मुख्य मलवाहिनी बदलण्याचे काम; पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन

पिंपरी : दैनिक संध्या

भोसरी–दिघी मार्गावरील संत निरंकारी सत्संग भवनासमोरील मुख्य ड्रेनेज वाहिनी चोकअप झाल्यामुळे दिघी (शिवनगर) परिसरातील अनेक घरांमध्ये मैलापाणी शिरण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. या समस्येचे कायमस्वरूपी निराकरण करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ई क्षेत्रीय कार्यालयामार्फत, क्षेत्रीय अधिकारी परशुराम वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य मलवाहिनी बदलण्याचे काम हाती घेण्यात आले असून, या कामासाठी संत निरंकारी सत्संग भवनासमोरील इंद्रधनू सोसायटीसमोरील रस्त्याची खोदाई करण्यात येणार आहे. या कामादरम्यान नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने भोसरी–दिघी मार्गावरील या ठिकाणची वाहतूक अंदाजे ४ ते ५ दिवसांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे प्रभाग क्रमांक ४, ५, ६ आणि ७ तसेच भोसरी व दिघी परिसरातील नागरिकांनी या कालावधीत पर्यायी मार्गांचा वापर करून महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मुख्य मलवाहिनी बदलण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर दिघी (शिवनगर) परिसरातील मैलापाणी तुंबण्याच्या समस्येचे कायमस्वरूपी निराकरण होण्यास मदत होणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. काम जलदगतीने पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागाच्या वतीने आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री आणि तांत्रिक यंत्रणा कार्यरत करण्यात आली आहे. ई क्षेत्रीय अधिकारी परशुराम वाघमोडे यांनी नागरिकांना कामाच्या कालावधीत वाहतुकीचे नियोजन करून पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे तसेच कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या सूचनांचे पालन करून महानगरपालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.




### नव्या कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा

पिंपरी : दैनिक संध्या

लायन्स क्लब ऑफ पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी (क्लब क्र. १३५४३३) च्या सन २०२६-२७ या वर्षासाठीच्या नव्या कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा चिंचवड येथील ZIP by Spree Hotels येथे शनिवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी लायन समाधान आसबे यांनी अध्यक्षपदाची, लायन सौरभ कुलकर्णी यांनी सचिवपदाची, तर लायन सुनील ढगे यांनी कोषाध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. या सोहळ्यास इन्स्टॉलिंग ऑफिसर लायन अशोक मिस्त्री (LCIP) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना पद व गोपनीयतेची शपथ देऊन आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. समाजसेवेची परंपरा अधिक व्यापक करण्यासाठी समर्पित भावनेने कार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमास एल.एम. गव्हर्नर दीपक लोया, क्लब ॲडमिनिस्ट्रेटर लायन दामाजी आसबे, माजी अध्यक्ष लायन अविनाश कुलकर्णी, नंदिनी आसबे, लायन विकास साखरे, ॲड. किरण पवार यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अखेर अधिकारी-कर्मचारी असे एकूण ३५ जण सेवानिवृत्त



■ पिंपरी (दै. संध्या)

महानगरपालिकेच्या वतीने जूलै २०२६ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या २१ तसेच स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतलेल्या १४ अशा एकूण ३५ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,पिंपरी-चिंचवड कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षा सुप्रिया सुरगुडे, नंदकुमार इंदलकर,मुख्य लिपिक माया वाकडे, विविध विभागांतील कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. जुलै २०२६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्यांमध्ये लेखाधिकारी प्रकाश ज्ञानोबा जाधव, कार्यालय अधिक्षक दौलत मदगे, सहाय्यक उद्यान निरीक्षक सुरेश कोळेकर, कॉम्प्युटर ऑपरेटर सुरेखा झेंडे, ज्ञानेश्वर शेडगे, मुख्याध्यापक सविता जाधव, जयश्री गळीतकर, उप शिक्षिका संगीता रोकडे, उज्ज्वला तापकीर, शिला सोनवणे, सर्व्हेअर मुकुंद क्षिरसागर, सुरक्षा सुपरवायझर भारत भले, रखवालदार राजेंद्र रायकर, ईश्वर बहोत, चंद्रकात राऊळ, मजूर दत्तात्रय काळभोर, दत्तात्रय टोपे, दिलीप गव्हाणे, शंकर धुमाळ, सफाई सेवक अशोक कांबळे, ज्योतीराम खैरमोडे यांचा समावेश आहे. तर स्वेच्छा निवृत्त घेतलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी अरूण सुपे, कार्यकारी अभियंता राजेंद्र जावळे, मनोहर जावरानी, वायरलेस ऑपरेटर श्रीकृष्ण बाबर, दूरध्वनी चालक जालिंदर साखरे, मुकादम राकेश गायकवाड, वंदना ओव्हाळ, शालन करडे, सफाई कामगार राजू शिंदे, बापू गायकवाड, अनिता रेड्डी, नमिना चव्हाण, सफाई सेवक राणू गायकवाड आणि भारत गायकवाड यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी, सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार माया वाकडे यांनी मानले.

## कुदळवाडी ते घरकुल स्पाईन रोडवरील वाहतूक कोंडीबाबत थेट उपमुख्यमंत्र्यांकडे तक्रार

■ पिंपरी (दै. संध्या)



- मारुती जाधव यांचे सुनेत्रा पवार यांना निवेदन; तातडीने कारवाईची मागणी

कुदळवाडी चौक ते घरकुल चेरीज स्वीट चौक दरम्यानच्या स्पाईन रोड व सर्व्हिस रोडवरील वाढती वाहतूक कोंडी, अनधिकृत पार्किंग, संशयित अनधिकृत बांधकाम आणि झाडतोडीच्या तक्रारींबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सामाजिक कार्यकर्ते मारुती जाधव यांनी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्याकडे निवेदन सादर करून तातडीने कारवाईची मागणी केली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, कुदळवाडी चौक ते कृष्णानगर संविधान चौक या मार्गावरील सर्व्हिस रोडवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत पार्किंग होत असल्याने स्थानिक नागरिक, वाहनचालक आणि विविध गृहनिर्माण सोसायट्यांतील रहिवाशांना दररोज मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. डॉल्फिन विस्टा सोसायटीलगत असलेले स्टार बाजार, मॅट्रिक्स क्लासेस, मौर्य फोर हॉटेल, सूर्य हॉस्पिटल तसेच कृष्णानगर पोलीस लाईनसमोरील बस पार्किंग यामुळे सर्व्हिस रोडवर वाहतूक कोंडी वाढत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. रस्ते आणि प्रवेशमार्गांमध्ये वाहने उभी राहत असल्याने नागरिकांना सुरक्षितपणे ये-जा करणे कठीण झाले आहे. कुदळवाडी ब्रिजच्या मुख्य चौकापासून घरकुल मुख्य चौकापर्यंतचे अवघे ३०० मीटर अंतर पार करण्यासाठी अनेकदा अर्धा ते पाऊण तास लागत असल्याचे जाधव यांनी नमूद केले आहे. त्यामुळे नागरिकांचा वेळ आणि इंधन मोठ्या प्रमाणात वाया जात असून दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होत आहे.

## आगीत युवकाचा गुदमरून मृत्यू

वाकड फाटा येथील दिल्ली ६ बिर्याणी हॉटेलमधील दुर्घटना

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड शहरातील वाकड फाटा परिसरातील दत्त मंदिर रस्त्यावर असलेल्या दिल्ली 6 बिर्याणी हॉटेलमध्ये भीषण आग लागून १९ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास हॉटेलमधील गॅस सिलेंडर संपल्यानंतर नवीन सिलेंडर जोडण्याचे काम सुरू असताना अचानक आगीचा आणि धुराचा मोठा भडका उडाला. काही क्षणांतच हॉटेलमध्ये धूर पसरल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच वाकड पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. मात्र, हॉटेलमध्ये अडकलेल्या मोहम्मद सहजद (वय १९) या युवकाचा धुरामुळे गुदमरून मृत्यू झाला. दरम्यान, सिलेंडर बसवण्यासाठी आलेला गॅस एजन्सीचा कर्मचारी घटनेनंतर घटनास्थळावरून पसार झाला असून त्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणात सुरक्षेच्या नियमांचे पालन करण्यात आले होते का, तसेच दुर्घटनेस नेमके कोण जबाबदार आहे याचा तपास वाकड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दोषी आढळणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## घर घर संविधान या कार्यक्रमाचे उद्घाटन

■ पिंपरी (दै. संध्या)



घर घर संविधान या उपक्रमाच्या माध्यमातून सुमारे ४ लाख विद्यार्थ्यापर्यंत व ८ लाख पालकांपर्यंत संविधानाची माहिती पोहचेल.त्यातून संविधानधिष्टीत जागृत समाज घडेल असा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आहे असे मत पिंपरी चिंचवड महानगरपालीकेच्या शिक्षण समिती सभापती रविना सागर अंगोळकर यांनी व्यक्त केले.*पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून ‘घर पर संविधान’ उपक्रमाचा प्रारंभ आज पीसीएमसी पब्लिक स्कूल वाल्हेकरवाडी येथे त्यांच्या हस्ते झाला त्यावेळी त्या बोलत होत्या. विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर नगरसेवक शेखर चिंचवडे नगरसेविका पल्लवी वाल्हेकर,योगिता बारणे,उपायुक्त अण्णा बोदडे,शिक्षणाधिकारी संगीता बांगर,संविधान अभ्यासक व माणगाव पॅटर्न चे प्रमुख नूर खा पठाण,सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते

यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर म्हणाले, संविधानाची मूल्ये आणि उद्देशिकेचा खरा अर्थ आपल्या बालवयापासूनच मुलांच्या मनावर रुजणे अत्यंत आवश्यक आहे.

याच उदात्त हेतूने पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागामार्फत संपूर्ण मनपा क्षेत्रात 'घर घर संविधान' हा एक अत्यंत प्रेरणादायी विशेष उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

बालवयातच संविधानाची ओळख आणि त्यातील लोकशाही, समता, बंधुता ही मूल्ये आत्मसात केल्यास उद्याची पिढी अधिक सुसंस्कृत, जबाबदार आणि जागरूक नागरिक म्हणून घडेल, यात शंका नाही. आपल्या भावी पिढीमध्ये संविधानाबद्दलचा आदर आणि जाणिवा अधिक दृढ करण्यासाठी या सुंदर उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहनही त्यांनी केले. भारतीय संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नाही तर भारतीय नागरिकांच्या सामाजिक,आर्थिक,राजकीय व सांस्कृतिक प्रगतीचा दस्तऐवज आहे असे मत संविधान अभ्यासक नूर खा पठाण यांनी व्यक्त केले.

दररोज संविधानाच्या एका कलमाची माहिती व त्याचे विवेचन या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थांना देण्यात येणार आहे.त्यामुळे संविधानाने दिलेले अधिकार व कर्तव्याची जाणीव विद्यार्थ्यांना होईल.सुजाण व सुज्ञ नागरिक घडण्यास मदत होईल असेही ते म्हणाले.

यावेळी उपायुक्त अण्णा बोदडे यांनी ही मनोगत व्यक्त केले.आभार शिक्षणाधिकारी संगीता बांगर यांनी व्यक्त केले.यावेळी सेवा निवृत्त शहर अभियंता एम टी कांबळे,रवींद्र दुधेकर,शरद जाधव वसंत साळवी अनिल सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

# अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्व २०२६ ला उत्साहपूर्ण प्रारंभ

उपमहापौर शर्मिला बाबर व आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते उद्घाटन; सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्व २०२६ या कार्यक्रमाचा आज भक्ती-शक्ती चौक, निगडी येथे मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या समता, सामाजिक न्याय, श्रमप्रतिष्ठा आणि परिवर्तनवादी विचारांचा वारसा समाजापर्यंत, विशेषतः युवा पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या महोत्सवाचे उद्घाटन उपमहापौर शर्मिला बाबर व आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.

आजच्या खासदार श्रीरंग आप्पा बारणे, आमदार महेश लांडगे,शंकर जगताप, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, अ प्रभाग अध्यक्षा अर्चना करांडे, नगरसदस्य अनिल घोलप,अनुराधा गोरखे, सुलभा उबाळे, सुप्रिया चांदगुडे, ऐश्वर्या तरस, निलेश तरस, मधुरा शिंदे, उपायुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गणेश अवघडे, जेजुरी देवस्थानाचे अध्यक्ष अनिल सौंदंडे, सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब अडागळे,संजय ससाणे, अरुण जोगदंड,युवराज दाखले,नितीन घोलप, प्रल्हाद सुधारे,सुनिल भिसे,रोहन भिसे,नाना कसबे,सतीश भवाळ,यादव खिलारे,विशाल कसबे,बाळासाहेब रसाळ,शिवाजी साळवे, डी.पी.खंडाळे, नेताजी शिंदे,नामदेवराव रिट्टे,भगवान शिंदे, पोपट आरणे, मारुती जाधव, नरसिंह वैरागर, सुरेश वैरागर, प्रसाद केसरे, अर्चना शिंदे, सुनिता भेंगळे, समिरा राजगुरू, अनिता जगधनेमहिला अध्यक्षा उषाताई कांबळे, कल्पना मोरे-दाखले,अनिशा पवार, संगिता नानेकर, गीता अडागळे, आशा शहाणे, मीना खिलारे, संदीप रोखडे, गणपत जाधव, अरुणा भोसले, तेजस्विनी भोसले, किर्ती जाधव, वंदना जाधव, सचिन लिमकर, विलास गडसिंग, संतोष जाधव, अनंत कुलकर्णी, सतीश रिट्टे तसेच विविध सामाजिक संस्था, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर, महिला भगिनी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दि. १ ते ७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत भक्ती-शक्ती चौक, निगडी येथे आयोजित या महोत्सवात सामाजिक प्रबोधनपर व्याख्याने, वैचारिक परिसंवाद, साहित्यिक कार्यक्रम, कवी संमेलन, लोककला सादरीकरणे, संगीत मैफिली, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी सनईवादन, पारंपरिक हलगीवादन, बँड स्पर्धा,स्वरचंदन' गीतगायन, 'महाराष्ट्राची लोकसंस्कृती' या सांस्कृतिक कार्यक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या सात दिवसांच्या महोत्सवात विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, साहित्यिक, विचारवंत, कलावंत आणि लोककलावंत सहभागी होणार असून, सामाजिक प्रबोधनासोबतच महाराष्ट्राची समृद्ध सांस्कृतिक परंपरा अनुभवण्याची संधी नागरिकांना उपलब्ध होणार आहे. महोत्सवातील सर्व कार्यक्रमांसाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

> “लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि लोककलेच्या माध्यमातून समाजातील वंचित, शोषित आणि सर्वसामान्यांच्या भावना प्रभावीपणे व्यक्त करत सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी केली. समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि मानवतेचा त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचे जतन आणि संवर्धन करण्याबरोबरच नव्या पिढीपर्यंत त्यांचा वैचारिक वारसा पोहोचविणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. या विचार प्रबोधन पर्वाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन, सांस्कृतिक जतन आणि लोकसहभाग अधिक दृढ होईल. नागरिकांनी या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा संदेश समाजात अधिक व्यापक करावा.” - आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

## थोडक्यात पण महत्वाचे

### आळे येथे सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नारायणगाव : दैनिक संध्या**



ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळ, आळे संचलित ज्ञानमंदिर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, आळे येथे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना डिजिटल विश्वात सुरक्षित राहण्याबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला आळेफाटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आजच्या डिजिटल युगात इंटरनेटचा वापर करताना अत्यंत सतर्क राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. अनोळखी व्यक्तींवर किंवा संशयास्पद संदेशांवर सहज विश्वास ठेवू नये, असे आवाहन त्यांनी केले. तसेच ऑनलाईन फसवणूक, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचा बचाव कसा करावा, आणि ओटीपी (OTP), पासवर्ड व वैयक्तिक माहितीची गोपनीयता कशी राखावी, याबद्दल त्यांनी सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष अजय कुऱ्हाडे, उपाध्यक्ष सौरभ कुऱ्हाडे, सचिव डॉ. अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुळवळे, दिनेश सहाणे, सम्राट कुऱ्हाडे,भाऊ कुऱ्हाडे, जीवन शिंदे, शांताराम कुऱ्हाडे,बाबू कुऱ्हाडे ,बबन सहाणे ,रमेश कुऱ्हाडे ,कैलास शेळके, प्रदीप गुंजाळ, शिवाजी गुंजाळ, उल्हास सहाणे ,देविदास पाडेकर,मुख्याध्यापक संदीप भवारी, ज्येष्ठ शिक्षक ज्ञानेश्वर वाघ, उपप्राचार्य सुरेश कुऱ्हाडे,आणि आळेफाटा पोलीस ठाण्याचे पोलीस पथक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी इंटरनेटचा जबाबदारीने वापर करण्याची आणि सुरक्षित डिजिटल व्यवहार करण्याची प्रतिज्ञा घेतली.




### स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त मोफत नेत्रसेवा उपक्रम

**नारायणगाव : दैनिक संध्या**

मा. श्री विनोद भाऊ थोरात मित्रपरिवार व पुणे जिल्हा प्राथमिक आरोग्य केंद्र सणसर , ता.बारामती, जि.पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मश्री डॉ. मनोहर डोळे मेडिकल फाउंडेशन, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे यांच्या विशेष सहकार्याने महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्वर्गीय.अजित दादा पवार साहेब यांच्या जयंतीनिमित्त मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर गुरुवार दिनांक. 30 जुलै 2026 रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र सणसर, ता. बारामती, जि.पुणे येथे आयोजित केले होते. या नेत्र शिबिरामध्ये एकूण 491 रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. त्यामध्ये 61 रुग्णांना मोतीबिंदू झाल्याचे निदर्शनास आले.त्यापैकी 46 रुग्णांवर नारायणगाव येथे अत्याधुनिक लेसर पद्धतीने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. रुग्णांना शस्त्रक्रियेसोबतच इतर सर्व आवश्यक वैद्यकीय सुविधाही पूर्णपणे मोफत पुरवण्यात आल्या, ज्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना मोठा दिलासा मिळाला. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विनोद थोरात, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले. शस्त्रक्रिया प्रक्रिया डॉ. प्रिया हरकल, डॉ. पल्लवी कुटे, डॉ. भाग्यश्री नागापुरे, डॉ. पूजा चव्हाण आणि डॉ. सिद्धी भिसे या तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.अत्याधुनिक आणि दर्जेदार नेत्रसेवा सर्वसामान्य व गरजू लोकांपर्यंत अगदी अल्पदरात किंवा मोफत पोहोचवणे हाचआमचा मुख्य उद्देश आहे. समाजसेवेची ही गौरवशाली परंपरा भविष्यातही अशीच अखंडपणे सुरू ठेवली जाईल, असा विश्वास संस्थेचे विश्वस्त डॉ. संदीप डोळे यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

## आरोग्य तपासणी शिबारात २ हजार नागरिकांची तपासणी : डॉ. अंजली पाटील

■ बारामती (दै. संध्या)

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, बारामती यांच्यावतीने १५ ते २८ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित विशेष आरोग्य तपासणी शिबिरात २ हजार नागरिकांची आरोग्य तपासणी, १०० रुग्णांवर मोतीबिंदू तसेच २० रुग्णांवर हर्निया शस्त्रक्रिया करण्यात आली.

नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरामध्ये रुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर सर्व रुग्णांना सुखरूप डिस्चार्ज देण्यात आला. नेत्र शस्त्रक्रिया शिबिरासाठी मोलाचे योगदान दिल्याबद्दल डॉ. चिन्मय महात्मे व त्यांच्या संपूर्ण टीमचा सत्कार करण्यात आला. तसेच शिबिराच्या आयोजनासाठी सहकार्य केल्याबद्दल एन्व्हायर्नमेंटल फोरम ऑफ इंडिया, बारामती या संस्थेचाही गौरव करण्यात आला. लॅप्रोस्कोपिक हर्निया शस्त्रक्रिया शिबिरामध्ये डॉ. लकडावाला व शल्यचिकित्सा विभागाच्या तज्ज्ञ पथकाने २० रुग्णांवर यशस्वी हर्निया शस्त्रक्रिया केल्या. अत्याधुनिक लॅप्रोस्कोपिक तंत्रज्ञानामुळे रुग्णांना कमी वेदना, जलद पुनर्वसन व गुणवत्तापूर्ण उपचार सुविधा उपलब्ध झाल्या. शिबारात निरोगी जीवनशैली, रक्तदानाचे महत्त्व, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध, माता-




बाल आरोग्य, पोषण व स्वच्छता याबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली. सार्वजनिक आरोग्य विभागाने लाभार्थी नोंदणी, समुपदेशन, जनजागृती व शिबिर व्यवस्थापनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

रक्तदान चळवळीला चालना देण्यासाठी रुग्णालय परिसरासह विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या अभियानादरम्यान एकूण २०० रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित उपक्रमामध्ये सर्व संबंधित विभागप्रमुख, प्राध्यापक, निवासी डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, परिचारिका, विद्यार्थी, कर्मचारी व स्वयंसेवक यांनी समन्वयाने कार्य करून उपक्रम यशस्वी केला आहे.

आरोग्य तपासणी, शस्त्रक्रिया, रक्तदान, आधुनिक निदान सेवा आणि व्यापक जनजागृती यांचा समन्वय साधणारे हे शिबीर समाजाभिमुख आरोग्यसेवेचे प्रभावी उदाहरण ठरले असल्याची भावना डॉ. अधिष्ठाता डॉ. अंजली पाटील यांनी व्यक्त केली आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते रेडिओलॉजी विभागातील अत्याधुनिक मॅमोग्राफी युनिटचे उद्घाटन करण्यात आले. या सुविधेमुळे महिलांमधील स्तनाच्या कर्करोगाचे लवकर निदान होण्यास मदत होणार असून बारामती व परिसरातील महिलांना आधुनिक निदान सेवा उपलब्ध होणार आहे.



## पुलाच्या बांधकामावर प्रश्नचिन्ह

■ नारायणगाव (दै. संध्या)

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६० वरील नारायणगाव जवळील बाह्यवळण रस्त्यावरील खोडद चौकात नव्याने बांधण्यात आलेल्या भुयारी मार्गाच्या पुलाला पहिल्याच पावसात मोठी गळती लागली आहे. पुलाच्या वरील भागातून भुयारी मार्गात सतत पाणी झिरपत असल्याने प्रवाशांनी आणि वाहनचालकांनी तीव्र चिंता व संताप व्यक्त केला आहे.

काही महिन्यांपूर्वीच या भुयारी मार्गाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले होते. मात्र, जुन्नर तालुक्यात सुरू असलेल्या सर्वसाधारण पावसातच पुलावरून पाणी गळत असल्याने या बांधकामाच्या दर्जाबाबत आता मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. यापूर्वी खोडद चौकात अनेक भीषण अपघात होऊन नागरिकांना आपला जीव गमवावा लागला होता. स्थानिक ग्रामस्थांनी केलेल्या सातत्यपूर्ण आंदोलनानंतर प्रशासनाने येथे भुयारी मार्ग बांधण्याचा निर्णय घेतला होता. या मार्गामुळे वाहतुकीचा प्रश्न सुटेल अशी आशा असताना, पहिल्याच पावसात पुलाला गळती लागल्याने परिसरात भीतीचे वातावरण आहे. यावेळी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६० चे अधिकारी दिलीप शिंदे यांनी सांगितले की, खोडद चौकातील भुयारी मार्गाचे बांधकाम नव्याने करण्यात आले आहे. दुभाजकाच्या भागातून भुयारी मार्गात पाणी झिरपत असल्याचे समोर आले असून, या गळतीचे नेमके कारण शोधून तातडीने उपाययोजना केल्या जातील. त्यामुळे वाहनचालकांनी घाबरून जाण्याचे कोणतेही कारण नाही. दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांनी या समस्येची तातडीने पाहणी करून गळती थांबवावी आणि भविष्यात कोणताही मोठा अपघात होणार नाही याची काळजी घ्यावी, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

## मनोज जरांगे-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आळंदीत १४५ जणांचे रक्तदान

■ आळंदी (दै. संध्या)

संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सकल मराठा समाज आळंदी शहर व पंचक्रोशीच्या वतीने धार्मिक व सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडले. श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात चलपादुकांचे अभिषेक, पूजन, दर्शन व पसायदान करण्यात आले. त्यानंतर ज्ञानदर्शन धर्मशाळेत आयोजित महारक्तदान शिबिरात १० महिलांसह एकूण १४५ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजसेवेचा आदर्श घालून दिला. रक्तदान शिबिराचे उद्घाटन मनोज जरांगे-पाटील यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे केले. यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, माजी नगराध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे पाटील, विनयाताई मुंगसे, सुधीर मुंगसे, किरण येळवंडे, राहुल चव्हाण यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक




यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. हजेरी मारुती मंदिरात आरती, महाप्रसाद व फळवाटप तसेच वारकरी सांप्रदायिक प्रशिक्षण शिबिराचेही आयोजन करण्यात आले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी अरुण कुरे, भागवत शेजूळ, अर्जुन मेदनकर, जयसिंह कदम, शशिकांत जाधव, दत्त फराटे, बालाजी शिंदे, रमाकांत शिंदे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## मा. निषाद मंगरूळकर यांचे ग्रामोन्नती मंडळ विशेष मार्गदर्शन

■ नारायणगाव (दै. संध्या)

ग्रामोन्नती मंडळ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव येथे दिनांक ३१ जुलै २०२६ रोजी ३६ महाराष्ट्र बटालियन, पुणे यांच्या वतीने एनसीसी प्रथम वर्ष प्रवेशासाठी मुलाखत व निवड प्रक्रियेचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या निवड प्रक्रियेस कमांडिंग ऑफिसर कर्नल निषाद मंगळूरकर यांनी प्रमुख उपस्थिती लावली. त्यांच्यासोबत ट्रेनिंग जेसीओ परविंदर सिंग, शमशेर सिंग तसेच पीआय स्टाफ उपस्थित होता. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी, मानसशास्त्र विभाग प्रमुख व कॅप्टन डॉ.दिलीप शिवणे, आळे कॉलेजचे एएनओ. प्रा. भगत.. प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, वरिष्ठ एनसीसी कॅडेट्स तसेच प्रथम वर्षातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावर्षीच्या एनसीसी प्रथम वर्ष प्रवेशासाठी एसीएस महाविद्यालय, नारायणगाव येथील सुमारे ५८ विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच आळे महाविद्यालयातील



३२ विद्यार्थी अशा एकूण ९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या सर्व विद्यार्थ्यांच्या मुलाखती रचित व अरचित पद्धतीने घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांचा उत्साह, शिस्त आणि देशसेवेची भावना पाहून उपस्थित अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमादरम्यान कमांडिंग ऑफिसर कर्नल निषाद मंगळूरकर यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत एनसीसीचे महत्त्व, शिस्त, नेतृत्वगुण, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि देशसेवा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "मी स्वतः एक एनसीसी कॅडेट होतो. त्यामुळे या महाविद्यालयात येऊन विद्यार्थ्यांमध्ये दिसणारा एनसीसीबद्दलचा उत्साह पाहून मला खूप आनंद झाला.

एनसीसीमध्ये प्रवेश मिळाला नाही तरी निराश होऊ नका. आयुष्यात कोणतेही क्षेत्र निवडा, परंतु प्रामाणिकपणे मेहनत घ्या, स्वतःचे ध्येय निश्चित करा आणि समाजासाठी काहीतरी करण्याची भावना कायम ठेवा." त्यांच्या या प्रेरणादायी विचारांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मुलाखत प्रक्रियेदरम्यान कर्नल मंगळूरकर यांनी विद्यार्थ्यांना "तुम्हाला एनसीसीमध्ये का प्रवेश घ्यायचा आहे?", "भविष्यात तुम्हाला काय बनायचे आहे?", "तुमचा आदर्श व्यक्ती कोण आहे?", "देशासाठी तुम्ही काय योगदान देऊ इच्छिता?" अशा विविध प्रश्नांद्वारे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, विचारशक्ती, संवादकौशल्य आणि नेतृत्वगुणांची चाचपणी केली. विद्यार्थ्यांनीही आत्मविश्वासाने उत्तरे देत आपले विचार मांडले.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

## महाराजस्व समाधान शिबीरामुळे महसूल प्रशासन लोकाभिमुख आणि नागरिक केंद्रित होईल - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

### जानाई- शिरसाई योजनेतून तालुक्यातील सर्व जलसाठे- तलाव भरण्याच्या उपमुख्यमंत्र्यांच्या सूचना

■ बारामती (दै. संध्या)

महसूल विभागाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरामुळे महसूल प्रशासन अधिक पारदर्शक, गतीमान, लोकाभिमुख आणि नागरिक केंद्रित होईल, अशा विश्वास राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. जिल्ह्यातील समाधानकारक पावसामुळे सर्व धरणे १०० टक्के भरली असून जानाई- शिरसाई योजनेतून तालुक्यातील सर्व जलसाठे- तलाव तातडीने भरण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून बारामती विधानसभा मतदारसंघ अंतर्गत श्री शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड टेकनॉलॉजी सोमेश्वर येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, पंचायत समिती सभापती किरण तावरे, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक संभाजी होळकर, नगराध्यक्ष सचिन सातव, सुयोग जगताप, सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे



अध्यक्ष पुरूषोत्तम जगताप, विविध संस्थाचे पदाधिकारी, नागरिक आदी उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आयोजित करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून या शिबिरात पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी आणि महिला यांच्या विविध विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण, त्यांच्या तक्रारी त्वरित निकाली काढणे शक्य होत आहे.

या शिबीराच्या माध्यमातून राज्यात हजारो महिलांची नावे 'महिला शेतकरी' म्हणून नोंद करण्यात आली आहे. अशा शिबीरांमुळे प्रशासन नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचले असल्याने हीच लोकाभिमुख शासन प्रणाली आहे. लोकांच्या तक्रारींचे निवारण करणे, त्यांच्या हक्कांची पूर्तता करणे आणि त्यांना न्याय देणं हेच खरे प्रशासनाचं कर्तव्य आहे.

गेल्या एक-दीड वर्षात महसूल विभागाने अतिशय क्रांतीकारी निर्णय घेतले आहे. या सर्व निर्णयामुळे नागरिकांचे जीवनमान उंचावणे, योजनांचे सुलभ पद्धतीने लाभ देण्यासह त्यांचा वेळ, पैसा वाचवण्यास मदत होत आहे. महसूल विभागांतर्गत सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत शेतजमीन, सातबारा, फेरफार, वारस नोंद, अकृषीक परवानगी अशा बाबींचा समावेश असून सर्व बाबींमध्ये पारदर्शकता, गती, न्याय हेच राज्य सरकारचे ध्येय आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रसिद्ध झालेल्या पहिल्या यादीत ६१ हजार ९०० पात्र लाभार्थ्यांना ५२३ कोटी २२ लाख रुपयांची कर्जमुक्तीचा लाभ देण्याचे काम सुरु आहे, असेही त्या म्हणाल्या.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार हे तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अखेरच्या श्वासापर्यंतपर्यंत कार्यरत होते. तालुक्यात सुरु झालेल्या अनेक उपक्रमांची, केलेल्या नवनवीन प्रयोगांची शासनाने वेळोवेळी नोंद घेतली आणि त्या योजनांचा समावेश राज्यपातळीवर केला गेला आहे.

बारामती विधानसभा मतदारसंघामध्ये सर्वाधिक सुमारे १८ कोटी ८८ लाख रुपयांचा निधी आणून शेतीसाठी पक्क्या पाणंद रस्त्यांचे जाळ मजबूत करण्याचे काम झाले आहे. मौजे पानसरेवाडी येथे शेतीसाठी संमत्तीने आज प्राथमिक स्वरूपात एक शेतरस्ता मंजूर करण्यात असून त्यामुळे १५ एकर शेतीसाठी कायम स्वरूपी हक्काचा रस्ता मिळणार आहे. सुपा मंडळाअंतर्गत संमत्तीने आणखी १०० रस्ते तयार करण्यात येणार असून ही एक सुरुवात आहे; यापुढेही आणखीन शेत रस्ते तयार करण्यात येणार असून त्यामुळे वाद विरहीत शेती होणार आहे, हा तालुका मजबूत पाणंद रस्ते-समृद्ध शेतकरी, विकसित महाराष्ट्राचे केंद्र ठरणार आहे.

बारामती महसूल विभागाच्यावतीने १० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रम, ग्रामीण भागातील शेत जमिनीच्या पोट हिश्श्याची मोजणी करुन नकाशा व सातबारा अद्ययावत करणे, सर्वांसाठी घरे, प्रधानमंत्री आवास योजना, शेत-घर, विहिरी बांधकामासाठी गौण खनिज उपलब्ध करुन देणे अशा विविध उपक्रमांची, मोहिमांची यशस्वी अंमलबजावणी केली आहे, या अभियानामध्ये तालुक्यातील सर्व विभागाच्या अंतर्गत असलेल्या योजनांचा लाभ आज प्रत्यक्षात देण्यात येत आहे.

महसूल, ग्रामविकास आणि इतर सर्व विभागांच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व सेवा आज दिल्या जात आहेत. या अभियानाचा अधिकाधिक नागरिकांनी व शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. शिबीरात सक्रीय सहभाग घ्यावा. आपल्या सहकार्यामुळे हे शिबीर निश्चित यशस्वी होईल, अशा विश्वास श्रीमती पवार यांनी व्यक्त केला.

घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांबाबत सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने प्रकल्पांबाबत जागा उपलब्ध करुन देण्याबाबत सकारात्मक विचार करावा; वित्त आयोग अथवा स्वनिधीमधून हा प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याबाबत श्रीमती पवार यांनी जिल्हा परिषदेला सूचना केली. जेष्ठ उद्योजक श्री आर. एन. शिंदे यांनी वाघळवाडी येथील आश्रमशाळेस दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने इमारत उभारण्यासाठी ५० लाख रुपये व ग्रामपंचायत वाघळवाडी इमारत बांधकामासाठी २५ लाख रुपयांची उपलब्ध देणगी जाहीर केली आहे, त्याबद्दल श्रीमती पवार यांनी त्यांचे आभार मानले.

श्री. जगदाळे म्हणाले, नागरिकांना केंद्रबिंदू मानून राज्य शासनाच्यावतीने विविध लोककल्याणकारी निर्णय घेण्यात आलेत, जिल्ह्यातील नागरिकांपर्यंत असे निर्णय, योजना पोहचविण्याचे काम करण्यात येईल, त्याचा लाभ नागरिकांनीही घ्यावा, असे आवाहन श्री. जगदाळे केले. या भागातील रस्ते आणि इतर पायाभूत सुविधा बळकटीकरणाला गती देण्यात येईल, असेही ते म्हणाले.

श्री. तावरे म्हणाले, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सामान्य नागरिकांना केंद्रबिंदू मानून त्यांचे प्रलंबित विषय मार्गी लावण्याचे काम केले, त्याच धर्तीवर हे समाधान शिबाराचे आयोजन करण्यात आले आहे, असेही श्री. तावरे म्हणाले. जिल्हा परिषद सदस्य करण खलाटे म्हणाले, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या यांच्यासह विविध विभागाच्या योजनांचे स्टॉलद्वारे लाभ देण्यात येणार आहे. परिसरात कचरा प्रकल्प उभारण्याबाबत श्री. खलाटे यांनी सूचना केली. श्री. जगताप म्हणाले, बारामतीच्या पश्चिम भागातील विद्यार्थ्यांकरिता क्रीडासंकुल उभारण्याचे काम सुरु आहे, त्याकरीता दिवंगत अजित पवार यांनी दीड कोटी रुपयांच्या निधी उपलब्ध करुन दिला होता, असे सांगून या भागातील टंचाई निवारणासाठी प्रयत्नांची गरज असल्याचे ते म्हणाले. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, तहसीलदार स्वप्नील रावडे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थी, नागरिक उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्राथमिक स्वरुपात लाभ प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. तसेच महसूल व कृषी विभागाच्या महत्त्वपूर्ण सुधारणा व कार्यालयीन सेवांची माहिती पुस्तिकाचे अनावरणही करण्यात आले.

### बारामतीसाठी ३० खाटांचे 'क्रिटीकल केअर ब्लॉक' मंजूर


त्या पुढे म्हणाल्या, राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत बारामतीसाठी ३० खाटांचे 'क्रिटीकल केअर ब्लॉक' मंजूर झाले आहे. यामुळे अत्यवस्थ रुग्णांसाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे. स्मार्ट व्हिलेज व इंटेलिजेंस व्हिलेज योजनेमध्ये महाराष्ट्रात निवड झालेल्या ७५ गावांपैकी विक्रमी १० गावे बारामती तालुक्यातील आहेत.

### सुमारे २० हजार नागरिकांना लाभ देण्याचे नियोजन

उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे म्हणाले, या शिबारात ३० स्टॉलच्या माध्यमातून सुमारे २० हजार नागरिकांना लाभ देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी राज्यशासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती घेऊन लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# थोडक्यात पण महत्वाचे



## पारंपरिक पद्धतीने पुस्तक वाचनाचा आनंद हरवू नये

मुंबई (दैनिक संध्या) : गिरगाव येथील आर्यन हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक नीलकंठ नामजोशी यांनी आज राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन, मुंबई येथे भेट घेऊन त्यांनी आपण लिहिलेल्या तीन पुस्तकांचा संच भेट दिला. राज्यपाल म्हणाले की, जेव्हा लेखक पुस्तक लिहितो, तेव्हा तो आपल्या विचारांना पंख देतो व जगाच्या ज्ञानात भर घालतो. पुस्तक कधीही मरत नाही. लेखक समाजाला काहीतरी परत देत असतो. एकमेकांना भेटताना पुष्पगुच्छ न देता पुस्तके दिली पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले. महाराष्ट्र ही संत आणि वीरांची भूमी आहे. राज्यात लेखकांची देखील एक मोठी परंपरा आहे. आज आपण ई-पुस्तकांच्या युगात वावरत असलो तरी देखील पारंपरिक पुस्तक वाचनाचे महत्व वेगळे आहे व पुस्तक वाचनाचा आनंद कायम आहे. नव्या युगात पारंपरिक पुस्तक वाचनाचा आनंद हरवू नये, अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली. नामजोशी यांनी राज्यपालांना 'मोगरा फुलाला दारी' हा कथासंग्रह, 'स्मृतिगंध' हे समाजातील गणमान्य व्यक्तींशी केलेल्या पत्रव्यवहाराचे संकलन असलेले पुस्तक तसेच 'भीमा' ही आदिवासी मुलीच्या कर्तृत्वाची व तिच्या आईच्या त्यागाची कहाणी असलेली कादंबरी भेट दिली. यावेळी नामजोशी यांचे कुटुंबीय उपस्थित होते.



## क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी लोकभवन, मुंबई येथे पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे सह सचिव एस. राममूर्ती, परिवार प्रबंधक डॉ निशिकांत देशपांडे तसेच लोकभवनातील अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.



## क्रांतिसिंह नाना पाटील यांना मंत्रालयात अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : स्वातंत्र्यसंग्रामातील महान सेनानी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात त्यांच्या प्रतिमेस अवर सचिव रामदास कोळेकर यांनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कक्ष अधिकारी भारत वानखेडे, कक्ष अधिकारी निलेश हरड यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## संजय राऊतांचा मंत्री जयकुमार गोरेंना इशारा

मुंबई (दैनिक संध्या) : उद्धव ठाकरे गटाचे नेते आणि राज्यसभा खासदार संजय राऊत आणि राज्याचे ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री जयकुमार यांच्यातील वाद शिगेला पोहोचला आहे. जयकुमार गोरेंविरोधात अवमानकारक व्यक्तव्य केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यानंतर आता संजय राऊतांनी गोरेंविरोधात टीका केली आहे. जयकुमार गोरे यांनी देखील कोण संजय राऊत म्हणत? प्रतिक्रिया देण्यास टाळले होते. यावर आता राऊतांनी जयकुमार गोरेंना दूर राहण्याचा सल्ला देत जवळ फिरकल्यास अडचणीत याल, असा इशारा दिला आहे.



# एअर इंडिया इमारतीच्या नूतनीकरणात लोकाभिमुख प्रशासकीय रचनेला प्राधान्य द्यावे

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ मुंबई (दै. संध्या)

राज्य शासनाच्या विविध शासकीय विभागांच्या गतिमान आणि सुलभ कार्यपद्धतीच्या दृष्टीने एअर इंडिया इमारतीचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. नूतनीकरण करताना लोकाभिमुख प्रशासकीय रचनेला प्राधान्य देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिले. वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एअर इंडिया इमारतीसंदर्भातील सादरीकरण करण्यात आले, त्यावेळी त्यांनी संबंधितांना निर्देशित केले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह अन्य संबंधित वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, मुख्य सचिव यांनी याबाबत संबंधितांची एक बैठक घेऊन सविस्तर चर्चा करुन सुयोग्य नियोजन करावे. विविध शासकीय विभागांतील कोणत्या विभागांचे स्थलांतर एअर इंडियाच्या नूतनीकरण इमारतीत करणे हे प्रशासकीय आणि नागरिकांच्या दृष्टीने सोयीचे ठरेल हे पाहावे. या ठिकाणी प्रशासकीय कार्यपद्धती ही सुलभ आणि लोकाभिमुख होईल यास प्राधान्य द्यावे. त्यानंतर याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल. वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, विकास चंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव (विशेष चौकशी अधिकारी) पंकज कुमार, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता प्रज्ञा वाळके; तसेच अन्य संबंधित वरिष्ठ अधिकारी, वास्तुविशारद उपस्थित होते. संभाव्य नूतनीकरण आराखड्यांचे सादरीकरण संबंधित वास्तुविशारदांद्वारे करण्यात आले.

# फडणवीस यांच्यात काहीतरी दैवी शक्ती

■ मुंबई (दै. संध्या)



देवेंद्र फडणवीस हे सर्वगुणसंपन्न आहेत. ते अनेक भूमिका लीलया पार पाडतात, असं वक्तव्य राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलं. रविवारी 'देवाभाऊ' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात त्यांनी हे वक्तव्य केलं. यावेळी चंद्रकांत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. त्यांनी म्हटले की, एक तर नक्की आहे, या माणसाला काहीतरी दैवी शक्ती मिळाली आहे. कारण एका माणसामध्ये इतके गुण कधीच नसतात.

चंद्रकांत पाटील म्हणाले, "एक तर नक्की आहे, या माणसाला (देवेंद्र फडणवीस) काहीतरी दैवी शक्ती मिळाली आहे. कारण एका माणसामध्ये इतके गुण कधीच नसतात. म्हणजे तो संघटकही असतो, राज्यकर्ताही असतो, मित्रही असतो, तो वाचतोही प्रचंड, लिहितोही प्रचंड, तो कुटुंबवत्सलही आहे. प्रत्येकाच्या आयुष्यातील घटना लक्षात ठेवून तो अभिनंदन करतो, असं चंद्रकांत पाटील यांनी म्हटलं आहे. देवेंद्रजी हे नाव असं आहे की त्यांच्याबाबतीत पुस्तक आहे म्हटल्यावर मी नाही म्हणू शकलो नाही. पुस्तकाच्या विविध चॅप्टर्सची माहिती मी घेतली. देवाभाऊंवर किमान २५ ते ३० पुस्तकं झाली आहेत. त्यातलं वेगळं पुस्तक हे देवाभाऊ आहे असं मला वाटतं. कारण या पुस्तकात त्यांचं बालपण, शाळा सोडली तो प्रसंग इथपासून सगळेच प्रसंग आहेत असंही चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं.

एका माजी मुख्यमंत्र्यांचा उल्लेख चंद्रकांत पाटील यांनी केला. ते म्हणाले, मी त्या माजी मुख्यमंत्र्यांचं नाव सांगणार नाही, मी केवळ वर्णन करेन, तुम्हाला समजून जाईल, असं ते म्हणाले. या मुख्यमंत्र्यांकडे कोणत्या कामाचा प्रस्ताव घेऊन गेल्यानंतर ते उभे राहायचे. तुमचं निवेदन वाचायचे आणि त्यावर पेनाने खुणा करायचे. लोकांना वाटायचं की, मुख्यमंत्री इतक्या गांभीर्याने निवेदन वाचत आहेत म्हणजे काम करायला घेतील. पण नंतर हे मुख्यमंत्री ते काम करायचे नाहीत. याबाबत पुन्हा विचारणा केल्यानंतर मुख्यमंत्री सांगायचे की, 'मी नंतर सांगतो तुम्हाला'. १०० पैकी ९९ जणांना असंच उत्तर मिळायचं. असं म्हणत चंद्रकांत पाटील यांनी उद्धव ठाकरेंचं नाव न घेता टीका केली.

### देवेंद्र फडणवीस यांचे काका पुण्यात राहतात हे अनेकांना आज कळलं असेल : चंद्रकांत पाटील

देवेंद्र फडणवीस यांचे काका बाळासाहेब फडणवीस हे पुण्यात राहतात हे आज अनेकांना कळलं असेल. कारण हे सगळेच जण म्हणजेच सगळेच फडणवीस कुटुंबीय लो प्रोफाइल राहतात. आपलं काम अतिशय शांतपणे करतात. बाळासाहेब फडणवीस यांनी भारतीय मजदूर संघाचं अध्यक्षपद भुषवलं आहे. बँकेच्या अधिकाऱ्यांचं प्रशिक्षण करणारी त्यांची संस्था आहे. तसंच ज्येष्ठ नागरिकांसाठीही ते काम करत आहेत अशीही माहिती चंद्रकांत पाटील यांनी दिली.

# पंतप्रधानांना वाचवण्यासाठी राजीनामा

■ मुंबई (दै. संध्या)

दिल्लीतल्या जंतर-मंतर या ठिकाणी झालेल्या विद्यार्थी आंदोलनाची चर्चा देशभरात रंगली होती. जून महिन्यात सुरु झालेलं हे आंदोलन सीजेपी म्हणजेच कॉक्रोच जनता पार्टीच्या पुढाकाराने सुरु झालं. या आंदोलनाचे दोन प्रमुख चेहरे होते ते म्हणजे कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके आणि दुसरा म्हणजे सोनम वांगचुक यांचा. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला पाहिजे ही प्रमुख मागणी आंदोलकांनी केली होती. जी २५ जुलैला पूर्ण झाली. हा राजीनामा का झाला? याचं उत्तर अभिजीत दिपकेंनी दिलं आहे. ३७ दिवस झालेल्या विद्यार्थी आंदोलनाला २० जुलैच्या नंतर वेगळं वळण लागलं. कारण २० जुलैला या आंदोलनावर जेव्हा पोलिसांनी लाठीचार्ज केला तेव्हा देशभरातून या आंदोलनाला मिळणारा पाठिंबा वाढला. अनेक सेलिब्रिटी, सामाजिक कार्यकर्ते, तसंच समाजातले विविध घटक यांनी या विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा दिला.

# जिल्हा नियोजन समितीअंतर्गत सुरू असलेल्या विकासकामांना गती द्या

### पालकमंत्री आशिष शेलार

■ मुंबई (दै. संध्या)



मुंबई उपनगर जिल्हा नियोजन व विकास समितीच्या (डीपीडीसी) माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकासकामांना गती देऊन ती निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिल्या.

मुंबई उपनगर जिल्ह्यातील जिल्हा नियोजन व विकास समितीअंतर्गत (डीपीडीसी) सुरू असलेल्या विकास कामांचा तसेच जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ अंतर्गत करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदींचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्ह्यातील विविध विकासकामांची सद्यस्थिती, कामांची प्रगती आणि निधीच्या उपलब्धतेचा आढावा घेण्यात आला. या बैठकीस मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२६-२७ अंतर्गत प्रस्तावित तसेच सुरू असलेल्या विविध विकास कामांचा संक्षिप्त आढावा सादर करण्यात आला. संबंधित विभागांनी मंजूर कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने करावी, तसेच विकास कामांच्या अंमलबजावणीतील अडचणी दूर करून कामांना गती द्यावी, असे निर्देश मंत्री ॲड. शेलार यांनी दिले.

जिल्ह्यातील विकासकामांसाठी उपलब्ध निधीचा प्रभावी आणि नियोजनबद्ध वापर करण्यासोबतच नागरिकांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळेल, याची संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी. मंजूर विकासकामे प्रलंबित राहणार नाहीत आणि निधीचा विनियोग वेळेत होईल, यासाठी विभागांनी समन्वयाने काम करावे, असेही मंत्री ॲड.शेलार यांनी सांगितले.


# युवक काँग्रेसचं नागपुरात आंदोलन

■ मुंबई (दै. संध्या)



कॉक्रोच जनता पार्टीचं नीट पेपरफुटीविरोधातील आंदोलन संपलं असलं तरीही अभिजीत दिपके महाराष्ट्रातील तरुणांसाठी हिरो ठरला आहे. त्यामुळे विविध माध्यमांकडून त्यांच्या मुलाखती घेतल्या जात असून या मुलाखतींमधून अनेकविध माहिती समोर येत आहे. दुसरीकडे राज्याच्या राजकारणात बऱ्याच घडामोडी घडत आहेत. नाशिकमध्ये छगन भुजबळ यांना पालकमंत्री बनवण्याच्या मागणीला जोर आला असून नाशिकमध्ये यासंदर्भातील पोस्टर्सही लागले आहेत. तर, मुंबईसह महाराष्ट्रातील अनेक भागात पावसाचाही जोर कायम असलेला पाहायला मिळतोय.

# नीट पेपरफुटी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर 'जेन झी'शी सरसंघचालकांचा संवाद



■ मुंबई (दै. संध्या)

देशभरात नीट पेपरफुटी प्रकरणावरून विद्यार्थ्यांमध्ये असंतोष व्यक्त होत असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) सरसंघचालक डॉ. मोहन भागवत ६ ऑगस्टला मुंबईत जेन झी आणि जेन अल्फा विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.

इंडियाज इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनाइट नेशन्सच्या (आयआयएमयुएन) १५ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित वार्षिक अजिंक्यपद (चॅम्पियनशिप) परिषदेत हा संवाद होणार आहे.

कॉक्रोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली देशभरात नीट पेपरफुटी प्रकरणावरून जेन झी आणि जेन अल्फा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तरुण पिढीची केंद्रातील भाजपप्रणित नरेंद्र मोदी सरकारविरोधात जोरदार आंदोलने सुरू आहेत. तरुण भीडभाड न ठेवता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याविरोधात रस्त्यावर उतरूनच नव्हे तर त्याना सहजसाध्य असलेल्या इंस्टाग्राम, यूट्यूबसारख्या समाजमाध्यमावरही व्यक्त होत आहेत. तरुणांचा आक्रोश इतका तीव्र होता की केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना अखेर राजीनामा द्यावा लागला. गेली अनेक वर्षे जनमानसाची नस अचूक ओळखणाऱ्या भाजपलाच नव्हे, तर संघालाही हा एक जबरदस्त धक्का मानला जात आहे. म्हणून गेल्या काही दिवसात संघाकडून आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात तरुण पिढीशी अधिक संवाद साधण्यावर तसेच त्यांची ऊर्जा राष्ट्रनिर्माणासाठी वापरण्याची भूमिका संघाच्या नेत्यांकडून सातत्याने मांडली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या या कार्यक्रमात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत 'भारतीय मूल्यांच्या आधारे वैश्विक एकात्मता साध्य करण्यात युवकांची भूमिका' या विषयावर जेन झी आणि जेन अल्फा विद्यार्थ्यांशी संवाद साधतील.

आयआयएमयुएन २०११ पासून कार्यरत असलेली तरुणांची मोठी संस्था आहे. ही संस्था शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व, राजकीय, सामाजिक नेतृत्वगुण वाढवण्याचे काम करते. यामध्ये विद्यार्थी विविध देशांचे प्रतिनिधी (डिप्लोमॅट) बनून संयुक्त राष्ट्रसंघाच्या धर्तीवर स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समस्यांवर एकत्र येऊन चर्चा करतात आणि त्यावर उपाय शोधतात. संस्थेच्या सल्लागार मंडळात उद्योगपती अजय पिरामल, दीपक पारेख, नादिर गोदरेज, काँग्रेसचे खासदार शशी थरूर, भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड, चित्रपट निर्माते करण जोहर, लष्कर, नौदल आणि हवाई दलाचे माजी प्रमुख तसेच माजी ऑलिम्पियन पी. टी. उषा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा समावेश आहे.

सध्याच्या सामाजिक आणि शैक्षणिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर तरुणांशी होणारा सरसंघचालकांचा हा संवाद महत्त्वाचा मानला जात आहे. नेतृत्व म्हणजे केवळ पुढील पिढीला दिशा देणे नव्हे, तर तिचे विचार ऐकून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्याच उद्देशाने डॉ. मोहन भागवत यांना विद्यार्थ्यांशी संवादासाठी निमंत्रित करण्यात आले आहे, असे आयआयएमयुएनचे संस्थापक ऋषभ शाह यांनी सांगितले. वांद्रे-कुर्ला संकुलातील नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटर येथे होणाऱ्या या कार्यक्रमात देशातील १०० हून अधिक शहरांतील १५ ते १९ वर्षे वयोगटातील सुमारे दोन हजार विद्यार्थी सहभागी होतील.

# ऐतिहासिक निर्णय : शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांना खाजगी प्रॅक्टिस बंदी कायम

संकल्प निरोगी महाराष्ट्राचा
सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

■ मुंबई (दै. संध्या)

मा. उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी ३० जुलै २०२६ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागातील शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांना खाजगी वैद्यकीय व्यवसाय (Private Practice) करता येणार नाही, असे स्पष्ट केले आहे. तसेच या विषयासंदर्भातील दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या सर्व याचिका फेटाळून लावल्या आहेत.

मा. न्यायालयाने आपल्या निर्णयात नमूद केले की, शासन सेवेत कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा नियम व शासनाच्या धोरणानुसार बांधील असून, त्यांनी पूर्णवेळ शासकीय सेवा बजावणे अपेक्षित आहे. त्यामुळे शासकीय सेवेत असताना खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास परवानगी देता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार असून, ग्रामीण व शहरी भागातील शासकीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती आणि रुग्णसेवा अधिक प्रभावी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या महत्त्वपूर्ण प्रकरणात शासनाच्या वतीने सहायक शासकीय अभियोक्ता अतुल काळे यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. तसेच, आरोग्य विभागाचे विधी सल्लागार ॲड. सतीश भेंडेकर यांनी कायदेशीर मुद्द्यांची मांडणी, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता व समन्वय साधून शासनाच्या बाजूला परिपूर्ण सहकार्य केले. कायदेतज्ज्ञ आणि आरोग्य क्षेत्रातील जाणकारांच्या मते, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असून, शासकीय सेवेतील शिस्त, उत्तरदायित्व आणि रुग्णहिताला प्राधान्य देणारा हा ऐतिहासिक निर्णय मानला जात आहे, असे आरोग्य विभागाने कळविले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ब्रेम्बो इंडिया आणि समर्थ ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स यांच्यात सामंजस्य करार संपन्न

जुन्नर : दैनिक संध्या

उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील दुवा अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने ब्रेम्बो इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि समर्थ ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, बेल्हे यांच्यात सामंजस्य करार (MoU) करण्यात आला. MaTPO (Maharashtra Association of Training and Placement Officers) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "ब्रेम्बो अकॅडेमिया मीट – २०२६" या कार्यक्रमात हॉटेल कलासागर, कासारवाडी (पुणे) येथे हा करार संपन्न झाला. ब्रेम्बो इंडियाच्या वतीने व्यवस्थापकीय संचालक श्री. लुका बोटाझी (Mr. Luca Bottazzi) आणि समर्थ ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या वतीने प्रशिक्षण व नियुक्ती अधिकारी प्रा. एस. एस. पोखरकर यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. या करारामुळे विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील इंटर्नशिप, उद्योग–संस्था परस्परसंवाद, कौशल्य विकास उपक्रम, तांत्रिक ज्ञानाची देवाणघेवाण तसेच रोजगारक्षमतेत वाढ करणाऱ्या विविध संधी उपलब्ध होणार आहेत. कार्यक्रमादरम्यान ब्रेम्बोच्या जागतिक कार्यपद्धती, आधुनिक औद्योगिक प्रवाह, करिअरच्या संधी आणि उद्योगातील नव्या तंत्रज्ञानाविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उपस्थित प्रतिनिधींनी चाकण येथील ब्रेम्बो इंडियाच्या अत्याधुनिक उत्पादन प्रकल्पालाही भेट दिली.



### शाहिर जमदाडे यांना राज्यस्तरीय समाज भुषण पुरस्कार प्रदान

नांदेड : दैनिक संध्या

■ सांस्कृतिक कार्यक्रमातुन नागरिकांचे समाज प्रबोधन करण्याच्या कामाचे मिळाले फळ

अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स नांदेड द्वारा दिला जाणारा छत्रपती राजर्षी शाहू महाराज राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार लोकराजा छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीदिनी प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते गीत मोह सांस्कृतिक कला मंच शिराढोण तालुका कंधार जिल्हा नांदेड संस्थापक अध्यक्ष शाहीर बापूराव जमदाडे शिराढोणकर यांना त्यांच्या सांस्कृतिक,शैक्षणिक,सामाजिक व इतर महत्त्वपुर्ण प्रबोधनाच्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. प्रामुख्याने ज्येष्ठ विचारवंत प्रा.डॉ. जे.टी.जाधव,मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, पूज्य भंतेजी पयाबोधी,प्रा.डॉ. सुनील चंद्र सोनकांबळे,लॉर्ड बुद्धा टी.व्ही.महाराष्ट्राचे मुख्य चीफ संवाददाता प्रा.डॉ.गजेंद्र गवई, आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार पी.एस. गवळे,कार्यक्रमाचे उद्घाटक सय्यद मुजीब भाई,अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सचे प्रदेशाध्यक्ष डी.एस.वाघमारे,भीम कायदा सामाजिक संघटना जिल्हाध्यक्ष विलास दादा गजभारे,राहुल प्रतिष्ठानचे अध्यक्ष पि.डी.झडते, राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठानचे प्रा.जे.जी.हनमंते,पत्रकार संभाजी सोनकांबळे,सरपंच एम.एन.गवळे, पत्रकार संजय निळेकर,नांदेड आकाशवाणी निवेदक बालाजी गवारे,दै.वीर शिरोमणी वर्तमान पत्राचे संपादक शंकर सिंह ठाकूर, दैनिक वीर शिरोमणी नांदेड जिल्हा प्रतिनिधी ॲड.सुजाता पोहरे व अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सचे संस्थापक अध्यक्ष बा.रा.वाघमारे व इतर सर्व प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार बापुराव जमदाडे यांना प्रदान करण्यात आला. शैक्षणिक कार्य करीत असतांना शाहीर बापुराव जमदाडे यांनी गीत मोह सांस्कृतिक कला मंचाची स्थापना करून या माध्यमातून वेगवेगळे सामाजिक,शैक्षणिक, धार्मिक, राजकीय व इतर प्रबोधनाचे वेळेनुसार कार्यक्रम घेवून ते सतत समाज प्रबोधनाचे फार मोठे व महत्त्वाचे काम करतात आणि या कार्याची दखल घेवून त्यांना वरील पुरस्कार प्रदान करण्यात आला.हा पुरस्कार मिळाल्यानंतर ते आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना म्हणाले की,मी करीत असलेले नागरिकांचे सामाजिक प्रबोधन व त्यांना देत असलेल्या ज्ञानाची शिदोरी अशा सर्व कामाचे मला मिळालेले हे फळ आहे असे ते म्हणाले. समाज भुषण पुरस्कार मिळाल्याबद्दल शाहिर बापुराव जमदाडे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

### रिमझिम पावसामुळे खरीप पिके जोमात; दोन महिन्यांनंतर पाऊस

काऱ्हाटी : दैनिक संध्या



बारामती तालुक्यातील पश्चिम पट्ट्या यंदा पावसाळ्याचे दोन महिने उलटले तरी अद्याप एकदाही दमदार पाऊस झाला नाही. परिणामी परिसरातील नदी, नाले, तलाव, विहिरी कोरड्या पडल्या होत्या, परंतू गेल्या तीन दिवसांपासून रिमझिम पाऊस पडत असल्याने खरीप हंगामातील पिकांना जीवदान मिळाले आहेत. गेल्या तीन दिवसांपासून परिसरात सुरू असलेल्या रिमझिम पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. दीर्घ प्रतीक्षेनंतर झालेल्या या पावसामुळे शेतातील पिकांना नवसंजीवनी मिळाली असून बाजरी,मका, सोयाबीन, कापूस, तूर, भाजीपाला तसेच इतर खरीप पिकांच्या वाढीस पोषक वातावरण निर्माण झाले आहे. दोन महिन्यांत एकही जोरदार पाऊस न पडल्याने अद्याप नदी, नाले, पाझर तलाव कोरडे असल्याने शेतकऱ्यापुढे सिंचनाचे गंभीर संकट उभे ठाकले आहे. विहिरीचे पाणी संपले असून अनेक ठिकाणी शेततळीदेखील कोरडी पडली होती. पेरणी केलेल्या बाजरी, मका, सोयाबीन, कापूस, तूर तसेच विविध भाजीपाला पिकांना रिमझिम पावसामुळे नवसंजीवनी मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले, तालुक्यातील या परिसरात मका, सोयाबीन, कापूस आणि तूर पिके सध्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर आहेत. रिमझिम पावसामुळे शेतशिवार हिरवेगार झाले असून, पिकांमध्ये नवचैतन्य दिसून येत आहे. मात्र, केवळ हलक्या पावसावर हंगामाचा भार राहणार नसून जलसाठे भरण्यासाठी आणि पिकांना पुरेसा ओलावा मिळण्यासाठी मुसळधार पावसाची आवश्यकता आहे. अनेक ठिकाणी विहिरी आणि बोअरवेलची पाणीपातळीही समाधानकारक वाढलेली नाही. सध्या सुरू असलेल्या रिमझिम पावसामुळे पिकांना तात्पुरता आधार मिळाला असला, तरी खरीप हंगाम यशस्वी होण्यासाठी दमदार पावसाची गरज आहे.

## म्हसोबा मंदिरातील चांदीचा घोडा व पादुकांची चोरी उघडकीस

### पिशवीत चांदीच्या वस्तू घेऊन फिरणाऱ्या संशयितांपासून सुरू झालेला तपास थेट चोरट्यांपर्यंत; बारामती शहर पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

■ बारामती (दै. संध्या)



बारामती शहरातील तांदुळवाडी रोड, कल्पनानगर परिसरातील म्हसोबा मंदिराचे कुलूप तोडून चोरीस गेलेला चांदीचा घोडा आणि चांदीच्या पादुकांचा जोड बारामती शहर पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपासाच्या आधारे हस्तगत केला आहे. विविध सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज, गोपनीय बातमीदारांची माहिती आणि संशयितांकडे केलेली कसून चौकशी यामुळे या मंदिर चोरीचा छडा लागला. दिनांक ५ जुलै २०२६ रोजी रात्री ते ६ जुलै २०२६ रोजी सकाळच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने कल्पनानगर येथील म्हसोबा मंदिराचे कुलूप तोडून मंदिरातील चांदीचा घोडा व पादुकांचा जोड चोरून नेला होता. याबाबत बारामती शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २७३/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०५ व ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे धार्मिक स्थळाशी असलेले गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. घटनास्थळासह परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज बारकाईने तपासण्यात आले. त्याचबरोबर गोपनीय बातमीदारांचे जाळे सक्रिय करण्यात आले.

तपास सुरू असतानाच दोन संशयित युवक एका पिशवीमध्ये चांदीच्या वस्तू घेऊन त्या विक्री करण्याच्या उद्देशाने बारामती परिसरात फिरत असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली. तपास पथकाने क्षणाचाही विलंब न करता संशयितांचा शोध घेत त्यांना ताब्यात घेतले आणि पोलीस ठाण्यात आणून चौकशी सुरू केली. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या संशयितांना पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी सदर चांदीच्या वस्तू इतर तीन जणांनी विक्रीसाठी दिल्याचे सांगितले. या माहितीच्या आधारे पोलिसांनी आणखी तीन जणांचा शोध घेऊन सर्व पाच जणांची एकत्रित व स्वतंत्रपणे कसून चौकशी केली.

चौकशीत धक्कादायक बाब समोर आली. एका विधीसंघर्षग्रस्त बालकाने म्हसोबा मंदिरातील चांदीचा घोडा व पादुकांचा जोड चोरून आणला आणि तो इतरांच्या मदतीने विक्री करण्यासाठी दिल्याचे निष्पन्न झाले. विधीसंघर्षग्रस्त बालकाची ओळख कायदेशीर तरतुदींनुसार गोपनीय ठेवण्यात आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी पुढील व्यक्तींना ताब्यात घेऊन कारवाई केली आहे - 1. आदित्य विलास बगाडे, वय २१ वर्षे, रा. प्रगतीनगर, बारामती. 2. अथर्व विलास बगाडे, वय १९ वर्षे, रा. प्रगतीनगर, बारामती. 3. अथर्व राजेंद्र ननावरे, वय १९ वर्षे, रा. माऊलीनगर, तांदुळवाडी रोड, बारामती. 4. कुंदन सुनील काजळे, वय २५ वर्षे, रा. कल्याणीनगर, तांदुळवाडी, बारामती. 5. एक विधीसंघर्षग्रस्त बालक. संशयितांकडून मिळालेल्या चांदीच्या वस्तू फिर्यादीस दाखविण्यात आल्या. फिर्यादीने त्या म्हसोबा मंदिरातून चोरीस गेलेल्या चांदीच्या पादुका व घोडा असल्याची खात्रीपूर्वक ओळख पटविली. त्यानंतर सोनाराकडून चांदीच्या वस्तूंचे वजन व शुद्धतेची तपासणी करून कायदेशीर पंचनाम्याने मुद्देमाल जप्त करण्यात आला. चोरी झाल्यानंतर आरोपींनी मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केला; मात्र चांदीच्या वस्तूंची पिशवी घेऊन फिरणे त्यांच्यासाठी घातक ठरले. गोपनीय माहितीचा अचूक वापर, सीसीटीव्ही फुटेजचे सूक्ष्म विश्लेषण आणि संशयितांच्या जबाबातील विसंगती शोधून काढत बारामती शहर पोलिसांनी या चोरीचा पर्दाफाश केला. सदर गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का, चोरीपूर्वी रेकी करण्यात आली होती का, चोरीचा माल कोणाला विक्री करण्यात येणार होता तसेच आरोपींचा अन्य गुन्ह्यांमध्ये सहभाग आहे का, याबाबत अधिक तपास सुरू आहे. ही कारवाई माननीय पोलीस अधीक्षक श्री. संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. चैतन्य कदम आणि बारामती शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. शैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपासी अंमलदार तथा पोलीस हवालदार यशवंत पवार, पोलीस हवालदार रामचंद्र शिंदे, पोलीस हवालदार अभिजीत कांबळे, पोलीस शिपाई पोपट कवितके, अक्षय सिताफ, गिरीश नेवसे, दत्ता मदने, तानाजी गोरे, ऋषिकेश जाधव, सागर जामदार आणि विशाल शिंदे यांनी विविध सीसीटीव्ही कॅमेरे, तांत्रिक तपास आणि गोपनीय बातमीदारांच्या मदतीने गुन्ह्याची यशस्वी उकल केली.

### डिंभे धरणाचा विसर्ग वाढला

■ पारगाव (दै. संध्या)

डिंभे धरण भरल्याने धरणाच्या पाचही दरवाजातुन आज सोमवारी सकाळ पासुन घोडनदीत मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यास सुरुवात केल्याने घोडनदीला पुर आला आहे. आंबेगाव तालुक्याच्या पुर्वभागातील गावामध्ये नदी काठावर असलेल्या शेतांमध्ये पाणी घुसल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. नदीवर असलेले अनेकांचे शेतीपंप पाण्याखाली गेले आहेत लाखणगाव येथील बेल्हा जेजुरी महामार्गावरील पुल पाण्याखाली गेल्याने आज सोमवारी सायंकाळी साडेचार वाजल्यापासून या रस्तावरील वाहतुक ठप्प झाली आहे. डिंभे धरण क्षेत्रात गेल्या आठवडाभरापासून पावसाचा जोर वाढल्याने आज सोमवारी सकाळी धरणातील पाणी साठा ९७ टक्क्याच्या पुढे गेल्याने खबरदारीचा उपाय म्हणुन आज सकाळ पासून धरणाच्या पाचही दरवाजातुन पाणी सोडण्यास सुरुवात केली आहे.

## पुण्याच्या विकासासाठी अतिरिक्त २५ टीएमसी पाणीकोट्याची मागणी

■ महापौर मंजुषा नागपुरे यांची पाटबंधारे मंत्र्यांकडे धाव

■ धायरीतील दोन पुलांना तातडीने ना-हरकत, मुळा-मुठा पुनरुज्जीवन मिशन आणि धरणांतील गाळ काढण्याचाही आग्रह

■ मुंबई / पुणे (दै. संध्या)



पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनी राज्याचे पाटबंधारे (जलसंपदा) मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन पुणे शहराच्या विकासाशी संबंधित विविध दीर्घकालीन प्रश्नांवर चर्चा केली. यावेळी त्यांनी पुण्याच्या भविष्यातील पाणीपुरवठ्यासाठी अतिरिक्त २५ टीएमसी पाणीकोटा मंजूर करण्यासह अनेक महत्त्वाच्या प्रस्तावांना तातडीने मंजुरी देण्याची मागणी करणारे निवेदन सादर केले. बैठकीत वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन भविष्यातील पाणी नियोजन, वाहतूक कोंडी, मुळा-मुठा नदीचे संवर्धन तसेच धरणांतील जलसाठा क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सकारात्मक चर्चा झाली.

महापौर नागपुरे यांनी धायरी परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रस्तावित दोन नवीन पुलांच्या बांधकामासाठी जलसंपदा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र तातडीने मंजूर करण्याची मागणी केली. तसेच पुणे शहराच्या पिण्याच्या पाण्याची भविष्यातील गरज लक्षात घेऊन अतिरिक्त २५ टीएमसी पाणीकोटा मंजूर करण्याचा आग्रह धरला.

याशिवाय मुळा-मुठा नदीच्या सर्वांगीण संवर्धनासाठी राज्यस्तरीय 'मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन मिशन' स्थापन करून नदीतील गाळ काढणे, प्रदूषण नियंत्रण आणि पूर व्यवस्थापनासाठी एकात्मिक आराखडा राबविण्याची मागणी करण्यात आली. खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर धरणांतील गाळ काढण्यासाठी विशेष मोहीम हाती घेऊन जलसाठा क्षमता वाढविण्यासाठी संयुक्त उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचाही प्रस्ताव त्यांनी मांडला.

यावर पाटबंधारे मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सर्व मागण्या सकारात्मकरीत्या ऐकून घेत संबंधित विषयांवर आवश्यक कार्यवाही करण्यासाठी अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात येतील, असे आश्वासन दिले.

यावेळी महापौर मंजुषा नागपुरे म्हणाल्या, "पुणेकरांना शाश्वत पाणीपुरवठा, कोंडीमुक्त रस्ते, सुरक्षित जलस्रोत आणि स्वच्छ मुळा-मुठा नदी मिळणे ही काळाची गरज आहे. पुणे शहराच्या विकासाशी संबंधित प्रत्येक महत्त्वाच्या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करून तातडीने निर्णय होण्यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे."

## शामकांत शेडगे यांच्या पुढाकारातून व्यसनमुक्तीचा जागर

■ पुणे (दै. संध्या)



येरवडा खुले कारागृहातील बंदीवानांच्या आरोग्यासह त्यांच्या मानसिक आणि सामाजिक पुनर्वसनाला प्राधान्य देत कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांच्या पुढाकारातून व्यसनमुक्तीपर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र कारागृह विभागाच्या 'सुधारणा व पुनर्वसन' धोरणांतर्गत शनिवारी (दि. १ ऑगस्ट २०२६) आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला १५० हून अधिक शिक्षाबंदीवानांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

येरवडा खुले कारागृह आणि पुण्यातील मनोविजय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दुपारी साडेचार ते सायंकाळी सहा या वेळेत हा कार्यक्रम पार पडला. बंदीवानांना व्यसनांच्या विळख्यातून बाहेर पडण्यासाठी मानसिक बळ देणे, व्यसनांमुळे होणाऱ्या शारीरिक, आर्थिक व कौटुंबिक दुष्परिणामांची जाणीव करून देणे आणि सुटकेनंतर त्यांना निरोगी व सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी प्रेरित करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. हा उपक्रम डॉ. सुहास वारके (भा.पो.से.), अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे; योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि सुनील ढमाळ, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांनी प्रमुख मार्गदर्शक तथा मनोविजय फाउंडेशनचे सल्लागार निलेश शिंदे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. बंदीवानांचे केवळ कारावासापुरते व्यवस्थापन न करता त्यांच्या विचारांमध्ये सकारात्मक बदल घडवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सन्मानाने परत आणण्यासाठी अशा प्रबोधनात्मक उपक्रमांची आवश्यकता असल्याच्या भूमिकेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. निलेश शिंदे यांनी तंबाखू, सिगारेट, मद्य, गांजा तसेच विविध अमली पदार्थांच्या व्यसनामुळे मानवी शरीरावर होणाऱ्या गंभीर दुष्परिणामांची माहिती दिली. व्यसनामुळे व्यक्तीचे शारीरिक व मानसिक आरोग्य बिघडण्याबरोबरच कुटुंबाची आर्थिक आणि सामाजिक घडीही कशी विस्कटते, हे त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले.

## चाकण येथे बालरंग भूमी परिषदेच्या वतीने बालनाट्य दिन साजरा

■ चाकण (दै. संध्या)

बालरंग भूमी परिषदेच्या वतीने चाकण येथे बालनाट्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. बाल नाट्यदिनानिमित्त इतिहास महाराष्ट्राचा या विषयावर आधारित चाकण येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित नाट्यछटा, स्वागत, समूह नृत्य, बालनाट्य अशा अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून उत्कृष्ट सादरीकरण केले. यावेळी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी बालरंगभूमी परिषदेच्या कार्याबद्दल गौरवोदगार काढत महाराष्ट्रातील बाल कलाकारांसाठी बालरंगभूमी उत्तम कलापीठ असल्याचे स्पष्ट केले. याप्रसंगी बालरंगभूमी व विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांनी विद्यार्थ्यांचा सन्मान केला. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून



नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, अभिनेते मनोज डाळिंबकर, विकास गोरे, बापू शेवकरी, बालरंगभूमीचे पुणे शाखा अध्यक्ष दिपाली शेळके, प्रमुख सल्लागार हनुमंत कुबडे , कोषाध्यक्ष शंकरराव घोरपडे, उपाध्यक्ष नारायण करपे, सहकार्यवाहक विजयकुमार तांबे, सहकोषाध्यक्ष नामदेव पडदुणे, तसेच पुणे जिल्ह्यातील विविध शाळांचे विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चाकण नगरपरिषदेवर रहिवाशांचे नियमितीकरणासाठी ठिय्या आंदोलन

■ चाकण(दै. संध्या)



चाकण नगरपरिषद हद्दीतील गट क्रमांक २ मधील महात्मा फुलेनगर येथील निवासी घरे नियमित करून मालमत्ता पत्रके (प्रॉपर्टी कार्ड) देण्यात यावीत, तसेच सदर जमीन म्हाडा किंवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे (एसआरए) हस्तांतरित करू नये, या मागण्यांसाठी स्थानिक रहिवाशांनी सोमवारी (दि. ३) चाकण नगरपरिषदेसमोर "जवाब दो" ठिय्या आंदोलन केले. या आंदोलनात नगरसेवक प्रेम जगताप, सामाजिक कार्यकर्ते दिनेश बचुटे, अमर साळवे, रत्नेश वैरागे, संदेश झाडे, चंद्रकांत बचुटे, डॉ. महेंद्र गालफाडे, दिलीप गालफाडे, युवराज गालफाडे, तानाजी लोखंडे आदींसह मोठ्या संख्येने रहिवासी सहभागी झाले होते.

आंदोलकांनी दिलेल्या निवेदनानुसार, गट क्रमांक २ मधील जमीन मूळची महसूल विभागाची असून सन १९५० ते १९६० दरम्यान ती तात्पुरत्या स्वरूपात पोलीस विभागाकडे देण्यात आली होती. मात्र, या जागेचा पोलीस विभागाने कधीही वापर केला नाही. त्यानंतर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती तसेच इतर गरजू कुटुंबांनी येथे घरे बांधून अनेक दशकांपासून वास्तव्यास सुरुवात केली आहे. सन २०१८-१९ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय) अंतर्गत या भागाचे सर्वेक्षण व मोजणी करून रहिवाशांची यादीही तयार करण्यात आली होती. तसेच खेड तहसीलदारांनीही या जागेवरील अतिक्रमणे नियमित करून संबंधितांच्या नावे करण्याबाबतचा सविस्तर अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केल्याचा दावा आंदोलकांनी केला.

दरम्यान, २५ मार्च २०२६ च्या शासन निर्णयानुसार आणि २२ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार अतिक्रमण नियमितीकरण व निष्कासनाबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. शासन निर्णयातील अनुक्रमांक १३ नुसार आपण नियमितीकरणासाठी पात्र असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.

सध्या प्रस्तावित विकास आराखड्यात सदर जागेवर म्हाडा किंवा एसआरएचे आरक्षण टाकून जमीन हस्तांतरण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही आंदोलकांनी केला. या निर्णयामुळे पिढ्यान् पिढ्या वास्तव्यास असलेल्या कुटुंबांचे विस्थापन होण्याची भीती व्यक्त करत त्यांनी या प्रस्तावाला तीव्र विरोध दर्शविला.

ही वस्ती मुख्यत्वे अनुसूचित जातींची असून गेल्या दहा वर्षांत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाला आहे. त्यातून विविध विकासकामे पूर्ण झाली असून, अधिकृत निधीतून विकसित झालेली ही जुनी दलित वस्ती कायम ठेवून तिचा विकास करावा, अशी मागणी करण्यात आली.

तसेच गट क्रमांक २ हा विस्तारित गावठाण क्षेत्रात समाविष्ट असल्याने येथील रहिवाशांची मालमत्ता पत्रके तयार करून त्यांना एफएसआयचा लाभ द्यावा, अतिक्रमणे शासन निर्णयानुसार नियमित करावीत आणि जमीन म्हाडा अथवा एसआरएकडे हस्तांतरित न करण्याबाबत लेखी आश्वासन द्यावे, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय, या प्रश्नावर जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत रहिवासी प्रतिनिधी व चाकण नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करून तोडगा काढावा, अशीही मागणी आंदोलकांनी चाकण नगरपरिषद मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांच्याकडे केली आहे.